मंगळवार, २७ सप्टेंबर २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक ७०
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

अंतरंग

'मविआ' नेत्यांनी जनतेची माफी मागावी -बावनकुळे/२
रोह्यात कालव्याचे पाणी पेटणार? ग्रामस्थ आक्रमक/७
भारताचा मालिका विजय; ऑस्ट्रेलियावर सरशी/८

## ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आता १६ ऑक्टोबरला मतदान



**मुंबई :** राज्याच्या विविध १८ जिल्ह्यांतील ८२ तालुक्यांमधील एक हजार १६५ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १३ ऑक्टोबरऐवजी आता १६ ऑक्टोबरला मतदान होणार आहे; तर मतमोजणी १४ ऑक्टोबरऐवजी १७ ऑक्टोबरला होईल, अशी माहिती राज्य निवडणूक आयोगाच्या प्रसिद्धिपत्रकाद्वारे देण्यात आली. राज्य निवडणूक आयोगाने एक हजार १६६ ग्रामपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यात सदस्यपदांसह थेट सरपंचपदाचाही समावेश आहे. सुधारित कार्यक्रमानुसार १६ ऑक्टोबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. नक्षलग्रस्त भागात दुपारी ३ वाजेपर्यंतच मतदानाची वेळ असेल. मतमोजणी १७ ऑक्टोबरला होईल.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनाला यश

# नवीन पनवेल उड्डाणपूल काँक्रीटीकरणासाठी दोन कोटी ४८ लाखांच्या कामाची बोली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

**भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली व शहर उपाध्यक्ष संदीप पाटील यांच्या पुढाकाराने झालेल्या रास्ता रोको आंदोलनाला मोठे यश आले आहे. त्या अनुषंगाने नवीन पनवेल उड्डाणपूल आणि एचडीएफसी सर्कल काँक्रीटीकरण करण्यासाठी सिडकोने दोन कोटी ४८ लाख रुपयांच्या कामाची बोली मागवणारी सूचना प्रसिद्ध केली आहे.**




नवीन पनवेल-माथेरान महामार्गाला जोडणाऱ्या या पुलामुळे पनवेल तालुक्यातील नेरे आणि माथेरानकडे जाणारी शेकडो गावे, वाड्या, पाडे जोडले गेले असून दळणवळणाचा हा प्रमुख मार्ग आहे. या उड्डाणपुलाची पावसामुळे दूरवस्था झाली. येथील खड्ड्यांमुळे रोज अपघात होऊन अनेक जण जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. या ठिकाणच्या रहदारीचा विचार करता उड्डाणपुलाच्या उतारावरील दोन्ही बाजूला सिमेंट काँक्रीटीकरण होणे गरजेचे असताना सिडको त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने हा पूल खड्डेमुक्त करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी भर पावसात पुलावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

भाजप कार्यकर्त्यांनी हिरीरिने सहभाग घेत पावसात भिजत रस्ता अडवल्यावर सिडकोच्या बांधकाम खात्याचे कार्यकारी अभियंता हे आमदार प्रशांत ठाकूर यांना भेटून आम्ही दोन महिन्यांत टेंडर प्रोसेस सुरू करतो तुम्ही आंदोलन मागे घ्या सांगत होते, पण त्याला नकार देऊन सर्वांनी पावसात रस्त्यावर ठाण मांडले, तर काहीजण रस्त्यावर झोपले. अखेर सिडको प्रशासन या आंदोलनापुढे नमले. सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे यांनी येत्या रविवारपर्यंत या उड्डाणपुलावरील खड्डे भरण्यात येतील तसेच आठवडाभरात पुलाच्या चारही बाजूंचे काँक्रीटीकरण करण्याची निविदा काढण्यात येईल, असे आश्वासन आमदार प्रशांत ठाकूर यांना फोन करून दिले. त्यानंतरच आंदोलन मागे घेण्यात आले होते, मात्र येत्या आठवडाभरात हे काम झाले नाही, तर आंदोलनाचा मार्ग मोकळा आहे, असा इशारा आमदार प्रशांत ठाकूर यांनी रास्ता रोको आंदोलनावेळी सिडको प्रशासनाला दिला होता. त्या अनुषंगाने सिडकोने न्यू पनवेल आरओबी येथे डेक स्लॅबच्या रिसरफेसिंगसह जोडरस्त्यांचे काँक्रीटीकरण करणे या शीर्षकाखाली दोन कोटी ४८ लाख ६९ हजार ८३९ रुपयांचे काम करण्यासाठी बोली मागवणारी सूचना प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे वाहनचालक, प्रवासी यांना मोठा दिलासा मिळाला असून नागरिकांकडून आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार मानले जात आहेत.

> *नवीन पनवेल उड्डाणपुलावरील खड्डे अपघातांना आमंत्रण होते. त्यामुळे या संदर्भात आम्ही आंदोलनाची भूमिका घेतली. नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर आणि आम्ही कधीही मागे राहत नाही. त्यामुळे भर पावसात आंदोलन करताना आम्ही कदापिही माघार घेतली नाही. शेवटपर्यंत सिडकोचे अधिकारी योग्य कार्यवाहीची भूमिका घेत नाही तोपर्यंत आंदोलन करीतच राहिलो. त्या अनुषंगाने या आंदोलनाला यश आले. त्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर, सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सिडकोचे आभार मानतो.*
>
> *-संदीप पाटील, उपाध्यक्ष, पनवेल शहर भाजप*

## बाळासाहेबांचे विश्वासू चम्पासिंह थापा यांनीही उद्धव ठाकरेंची साथ सोडली

### शिंदे गटात दाखल; सेवेकरी मोरेश्वर राजेंचाही पाठिंबा

**मुंबई : प्रतिनिधी**



शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे अत्यंत विश्वासू सेवेकरी आणि एकेकाळी 'मातोश्री'मधील सदस्य म्हणून ओळख असलेल्या चम्पासिंह थापा यांनीही माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची साथ सोडत सोमवारी (दि. २६) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत त्यांना साथ देण्याचा निर्णय घेतला. याचबरोबर बाळासाहेबांचे सेवेकरी असलेले मोरेश्वर राजे यांनीही या वेळी मुख्यमंत्री शिंदेंना पाठिंबा दिला.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे अत्यंत विश्वासू सेवेकरी म्हणून चम्पासिंह थापा ओळखले जातात. बाळासाहेब राज्यात दौरे किंवा सभेनिमित्त जायचे त्या वेळी त्यांच्यासोबत थापा सावलीसारखे उभे असायचे. बाळासाहेबांच्या प्रकृतीची काळजी घेणे, त्यांना जेवण, औषधे देणे अशी कामे ते करीत. 'मातोश्री'मधील एक सदस्य म्हणून ते ओळखले जात. त्यांनी सोमवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ठाण्यातील टेंभीनाका येथील देवीच्या मिरवणुकीदरम्यान भेट घेऊन पाठिंबा दिला. (पान २ वर..)

> **जी चूक २०१९ला व्हायला नको होती ती तुम्ही दुरुस्त करीत आहात. बाळासाहेबांचे विचार जो कोणी पुढे नेईल त्याच्याबरोबर मी सदैव राहिन असे सांगत चम्पासिंह थापा यांनी बाळासाहेबांच्या आणि हिंदूत्वाच्या विचारांच्या आपल्या शिवसेनेला पाठिंबा दिला आहे.**
>
> **-एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्यपदी निवड झाल्याबद्दल शैलेश लक्ष्मणशेठ म्हात्रे यांचे 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, भाजप तालुका उपाध्यक्ष सचिन पाटील, शरद खारकर उपस्थित होते.**

## निवडक

### यूपीमध्ये ट्रॅक्टर तलावात उलटून १० जणांचा मृत्यू

**लखनऊ :** उत्तर प्रदेशची राजधानी लखनऊच्या ग्रामीण भागात सोमवारी (दि. २६) सकाळी एक भीषण दुर्घटना घडली. सीतापूरहून उनाई देवी मंदिराकडे जाणाऱ्या भाविकांचा ट्रॅक्टर ट्रॉलीसह इटौंजा तलावात उलटून १० जणांचा मृत्यू आणि ३७ जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### राजस्थानातील राजीनामानाट्य मुख्यमंत्री गेहलोतांना भोवणार?

**नवी दिल्ली :** राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत समर्थक आमदारांच्या राजीनामानाट्याची काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी यांनी गंभीर दखल घेतली आहे. मुख्यमंत्रिपदावरून आमदारांचे राजीनामे व दबावानंतर गेहलोतांचे नाव अध्यक्षपदाच्या शर्यतीतून वगळले जाऊ शकते. सचिन पायलट मुख्यमंत्री होण्यास गेहलोत समर्थक आमदारांनी विरोध दर्शविला होता.





**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मिडलक्लास सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने सोसायटी मैदानात विराजमान देवीची भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते पूजा करण्यात आली.**
(छाया : लक्ष्मण ठाकूर)

### राज्यातील सत्तासंघर्षावर आज घटनापीठापुढे सुनावणी

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील सत्तासंघर्ष, आमदार अपात्रता आणि खरी शिवसेना कोणाची या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यीय घटनापीठापुढे मंगळवारी (दि. २७) सुनावणी होणार आहे. खरी शिवसेना कोणाची याबाबत केंद्रीय निवडणूक आयोगापुढे सुनावणी प्रलंबित असून ती सुरू करायची की नाही याबाबतचा निर्णयही मंगळवारी अपेक्षित आहे.

## राज्यात २० हजार पोलिसांची पदे भरणार

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्यातील पोलीस विभागात २० हजार पदांची भरती करण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. २६) येथे दिली. सायबर सुरक्षेचा आढावा घेतल्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते.

पोलीस विभागातील भरतीबाबत यापूर्वी सात ते आठ हजार पदांच्या भरतीबाबत एक जाहिरात काढण्यात आली आहे. त्यानंतर आता आणखी १२ हजार पदांसाठीची जाहिरात लवकरात लवकर काढण्यात येईल. या भरतीमुळे पोलीस दलाला चांगली मदत होईल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. सायबर गुन्हे तत्काळ उघडकीस यावेत यासाठी काही सुधारणा केल्या जातील, असेही त्यांनी सांगितले.

## रायगडात पावसाने वार्षिक सरासरी ओलांडली

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात पावसाने वार्षिक सरासरी ओलांडली आहे. सोमवारपर्यंत (दि. २६) जिल्ह्यात वार्षिक सरासरीच्या १००.२१ टक्के पाऊस पडला. समाधानकारक पडलेल्या पावसामुळे जिल्ह्यातील धरणांमध्ये ९८ टक्के पाणीसाठा झाला आहे.

### जिल्ह्यातील धरणांमध्ये ९८ टक्के पाणीसाठा



रायगड जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान तीन हजार २१६ मिलीमीटर आहे. जिल्ह्यात २६ सप्टेंबरपर्यंत तीन हजार २२३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. वार्षिक सरासरीच्या १००.२१ टक्के पाऊस पडला आहे. जून महिन्यात जिल्ह्यात सरासरी ६४३ मिमी पाऊस पडतो. यंदा मात्र ३५७ मिमी पावसाची नोंद झाली. जुलै महिन्यात जिल्ह्यात साधारणपणे ११५९ मिमी पाऊस पडतो. यंदा १४६० मिमी पाऊस नोंदला गेला. ऑगस्ट महिन्यात साधारणपणे ८७४ मिमी पाऊस पडतो. या वर्षी त्या तुलनेत ८२३ मिमी पाऊस पडला. (पान २ वर..)

**नवरात्रोत्सव विशेष**

## मोरा गावातील जागृत एकविरा देवी

**उरण : दिनेश पवार**



उरण शहरापासून चार किमी अंतरावर मोरा कोळीवाडा बोरी पाखाडी फड नं. ७ येथे एकविरा देवीचे स्वयंभू व जागृत देवस्थान आहे. मोरा गावाजवळील मोठ्या खडकात कोरीव काम केलेले देवीचे मंदिर आहे. हे देवस्थान पांडवकालीन असल्याने पंचक्रोशीसह इतर ठिकाणांहून असंख्य भाविक नवरात्रोत्सवात आवर्जून दर्शनासाठी येतात.

येथील एकविरा देवी ही रेणुकामातेचा अवतार म्हणून ओळखली जाते. ती आदिशक्ती असून मोरा कोळीवाडा गावचे आराध्य दैवत आहे. एकविरा मातेची मूर्ती पाषाणाची आहे. दरवर्षी चैत्र महिन्यात या देवीचा उत्सव ग्रामस्थ व श्री एकविरा देवी सामाजिक विकास संस्था यांच्या वतीने साजरा केला जातो. नवरात्रोत्सवातही नऊ दिवस देवीचा उत्सव अत्यंत श्रद्धेने व मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. या निमित्ताने विविध कार्यक्रम होतात, अशी माहिती संस्थचे अध्यक्ष प्रदीप कोळी व सहकारी तसेच ग्रामस्थांनी दिली.



# ‘मविआ’ नेत्यांनी जनतेची माफी मागावी

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची ‘वेदांता फॉक्सकॉन’प्रकरणी मागणी

**मुंबई : प्रतिनिधी**

वेदांता फॉक्सकॉनचा प्रकल्प पुण्याजवळ तळेगाव येथे उभारण्यासाठी तत्कालीन महाविकास आघाडी सरकारच्या काळात कोणताही करार झालेला नव्हता आणि कंपनीला त्या प्रकल्पासाठी कोणताही भूखंड दिलेला नव्हता असे स्पष्ट करणारा कागदोपत्री पुरावा उपलब्ध झाला असून याविषयात खोटे बोलून राज्यातील जनतेची दिशाभूल केल्याबद्दल महाविकास आघाडीच्या नेत्यांनी माफी मागितली पाहिजे, अशी मागणी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी नागपूर येथे पत्रकारांशी बोलताना केली.



शिवसेना नेते व माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी शनिवारी तळेगाव येथे वेदांता फॉक्सकॉन विषयावरून केलेले आंदोलन हा खोटारडेपणा होता. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी अशी खोटारडी आंदोलने बंद करावीत, अन्यथा ते जेथे आंदोलन करतील तेथे जाऊन आम्ही त्यांना जशास तसे उत्तर देऊ, असाही इशारा बावनकुळे यांनी दिला. बावनकुळे पुढे म्हणाले, वेदांता फॉक्सकॉन कंपनीबाबत एमआयडीसीचे पत्र आपल्याकडे आहे. त्या पत्रात स्पष्ट म्हटले आहे की, त्या कंपनीसोबत राज्य सरकारचा सामंजस्य करार झालेला नाही आणि कंपनीस महामंडळाकडून जागेचे वाटप झालेले नाही. अशा स्थितीत हा प्रकल्प महाराष्ट्रातून गुजरातला गेला ही महाविकास आघाडीच्या नेत्यांची तक्रार खोटारडेपणाची आहे. प्रत्यक्षात आघाडी सरकारने कंपनीशी करार केला नाही आणि जमीनही दिलेली नाही, हे आता उघड झालेले आहे. हा प्रकल्प महाविकास आघाडीमुळेच राज्याबाहेर गेल्याचा हा पुरावा आहे. खोटारडेपणाबद्दल आघाडीच्या नेत्यांनी माफी मागावी. त्यांनी सांगितले की, वेदांताच्या विषयावरून महाविकास आघाडीच्या नेत्यांचे आंदोलन म्हणजे इव्हेंट मॅनेजमेंट करून राज्यातील जनतेची दिशाभूल आहे. या नेत्यांनी जनतेची माफी मागण्यासोबतच ही आंदोलने बंद करावीत अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरून जशास तसे उत्तर देऊ.

ते पुढे असेही म्हणाले की, अतिवृष्टीचे संकट आले असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः गडचिरोली आणि वर्धा जिल्ह्याला भेट देऊन पाहणी केली. ताबडतोब पंचनामे झाले. आता पूर्व विदर्भाला ११९१ कोटी रुपयांची मदत देण्याचा शासनाचा आदेश आला आहे. आपली अधिकाऱ्यांशी चर्चा झाली असून लवकरच शेतकऱ्यांना पैसे मिळतील. पूर्व विदर्भातील शेतकऱ्यांना आतापर्यंत इतकी मोठी मदत कधीही मिळाली नाही.

शिंदे फडणवीस सरकारने बुलेट ट्रेनच्या तत्परतेने काम केले आहे. आपण भारतीय जनता पक्ष व शेतकऱ्यांच्या वतीने या सरकारचे आभार मानतो, असेही ते म्हणाले.

# बिबट्याची नखे विकणाऱ्या टोळीतील आणखी दोन आरोपींना अटक

## १८ नखे जप्त; माणगाव पोलिसांची कारवाई

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव पोलिसांनी बिबट्याची नखे विकणारी टोळी चार दिवसांपूर्वी अटक केली होती. त्यांच्याकडून १० बिबट्याची नखे जप्त करण्यात आली होती.

याप्रकरणात सुरुवातीला अटक करण्यात आलेल्या चार आरोपींना २३ सप्टेंबर रोजी माणगाव येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांच्या समोर हजर केल्यावर त्यांच्या जबानीच्या आधारे आणखी दोन आरोपींना अटक करण्यात येऊन त्यांच्याकडून बिबट्याची आठ नखे जप्त करण्यात येऊन असे एकूण १८ नखे जप्त करण्यात वनविभागाला यश आले आहे.

वन्यजीवांची हत्या करून अवयवांची तस्करी मोठ्या प्रमाणात वाढत चालली आहे.





या अवयवांना बाजारपेठेत चांगला मोबदला मिळत असल्याने अनेक टोळ्या वन्यजीवांची हत्या करून तस्करी करीत आहेत. अशीच बिबट्याच्या नख्यांची विक्री करीत असताना टोळीतील चार आरोपी व १० बिबट्याची नखे वनविभाग माणगाव व माणगाव पोलिसांनी गजाआड केले होते. या प्रकरणाचा अधिक तपास माणगाव वनविभाग खाते करीत होते. सुरुवातीला अटक करण्यात आलेल्या चार आरोपींकडून माहिती मिळाल्यावर आरोपी क्र.पाच रमेश विष्णू जाधव रा. रोहा यांच्याकडून पाच बिबट्याची नखे तसेच आरोपी क्र.सहा मारुती भिकाजी चव्हाण रा. रोहा यांच्याकडून तीन बिबट्याची नखे वनविभागाकडून जप्त करण्यात आली आहे. २६ सप्टेंबर रोजी सुरुवातीला अटक करण्यात आलेल्या चार आरोपींना माणगाव न्यायालयासमोर हजर केलेअसता आरोपी क्र.चार मंगेश पवार रा.रोहा याला वाढीव एक दिवसाची वनकोठडी तर उर्वरित तीन आरोपी यांना न्यायालयाने सशर्त जामीन मंजूर केला.

# नवी मुंबई बंगाली असोसिएशनतर्फे शारदोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई बंगाली असोसिएशनतर्फे साजऱ्या केल्या शारदोत्सवाचे यंदा ४३वे वर्ष आहे. संपूर्णपणे वातानुकूलित सिडको एक्झिबिशन सेंटर वाशी येथे अतिशय उत्साहात व दिमाखात हा सोहळा एक ते पाच ऑक्टोबरपर्यंत होणार आहे. कोविड महामारीने जनजीवन पुरते ठप्प झाले होते. त्यामुळे सण व उत्सवांची अतिशय आतुरतेने वाट पाहिली जात होती. या एकंदरीत परिस्थितीला अनुसरून यंदाच्या वर्षी मानवतेचे जतन करत साजरा करू या जीवनाचा सोहळा ही अतिशय समर्पक थीम ठरविण्यात आलेली आहे.

असोसिएशनच्या वतीने बंगाली पारंपरिक पद्धतीने पर्यावरणस्नेही आणि अतिशय नयनरम्य असा शारदोत्सव साजरा केला जाणार आहे. बंगालच्या पारंपरिक कलाप्रकाराचे मनोहारी दर्शन



या ठिकाणी घडेल. या वेळी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शारदोत्सवाच्या पाचही दिवशी सर्वत्र उत्सवाचे वातावरण असणार आहे. याठिकाणी येणाऱ्या भाविकांना विविध कॉर्पोरेट, नॉन-फूड व फूड स्टॉल्सचा आनंद घेता येईल. तब्बल ५० फूड आणि ४० नॉन-फूड स्टॉल्स या वातावरणातील मौजमजा, आनंद द्विगुणित करण्यासाठी आणि उत्सव सर्वांसाठी संस्मरणीय बनवण्यासाठी सज्ज असतील. वेगवेगळे कारीगर, कलाकार दूरवरून येऊन या शारदोत्सवात आपापल्या विविध वस्तू प्रस्तुत करणार आहेत. एकापेक्षा एक सरस स्वादिष्ट खाद्यपदार्थांची विशेष रेलचेल याठिकाणी आयोजित केली जाणार आहे.

बंगालमधील लोकप्रिय कलाकार दुर्निबर साहा, टीव्हीएस सारेगम व इंडियन आयडॉलमधून घराघरात पोचलेले इमॉन चॅटर्जी व मेखला दासगुप्ता, ख्यातनाम डान्स ट्रूप आंगिक डान्स अकॅडमी यांनी सादर केलेले गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांचे चंडालिका, बँड वैद्यास यांचे परफॉर्मन्सेस होणार आहेत. इतकेच नव्हे तर, बॉलिवूड मेगा स्टार शान महानवमीच्या रात्री आपला विशेष परफॉर्मन्स सादर करण्यासाठी याठिकाणी येणार आहे. या दुर्गोत्सवाचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन एनएमबीएचे सदस्य अशीम डे यांनी केले आहे.



**उरण : आमदार महेश बालदी यांच्या संपर्क कार्यालयात पं. दिनदयाळ उपाध्याय यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी आमदार महेश बालदी, भाजप तालुका अध्यक्ष रवी भोईर, शहर अध्यक्ष कौशिक शाह, नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, भाजप तालुका सरचिटणीस सुनील पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर, रोहित पाटील आदी उपस्थित होते.**

# करंजाडेत दुचाकी अपघातात एक ठार, एक जण जखमी

**पनवेल : वार्ताहर**

भरधाव वेगाने जाणाऱ्या मोटरसायकलवरील चालकाने समोरून येणाऱ्या दुचाकी वाहनास धडक दिल्याने झालेल्या अपघातात एक ठार, तर एक जखमी झाल्याची घटना करंजाडे हद्दीत घडली आहे.

इरफान अल्लाउद्दीन अन्सारी याने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल वेगाने व हयगयीने चालून करंजाडे येथील संभव ग्रुप ऑफ बिल्डर्स अँड डेव्हलपर्सच्या कार्यालयासमोरील रस्त्यावर आर चार येथे सूर्यकांत शिंदे यांच्या गाडीत धडक दिल्याने झालेल्या अपघातात सुर्यकांत शिंदे हे गंभीररित्या जखमी होऊन मयत झाले आहेत तर आरोपी इरफान अन्सारी जखमी झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



**उरण : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मन की बात हा कार्यक्रम रविवारी प्रक्षेपित झाला. हा कार्यक्रम आमदार महेश बालदी यांच्या संपर्क कार्यालयात टीव्हीवरून सर्वांनी अनुभवला. भाजप तालुका अध्यक्ष रवी भोईर, अल्पसंख्याक सेल जिल्हा अध्यक्ष जसिम गॅस, उरण भाजप तालुका सरचिटणीस सुनील पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.**

# हुतात्मा नाग्या कातकरींना अभिवादन

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

चिरनेर येथे २५ सप्टेंबर १९३० रोजी आक्कादेवीच्या माळरानावर ब्रिटिश सत्तेविरुद्ध झालेल्या गौरवशाली व शौर्यशाली चिरनेर जंगल सत्याग्रहात देशाच्या स्वातंत्र्यासाठी आदिवासी समाजातील आपल्या प्राणाची आहुती देऊन हौतात्म्य पत्करलेल्या हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांना अभिवादन करण्यासाठी आक्कादेवीच्या माळरानावर रायगड जिल्ह्यातील सर्वजण एकत्र आले होते. सारसोई आदिवासीवाडी येथून चिरनेर आक्कदेवीवाडीपर्यंत १५० युवक कृष्णा काळ्या वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली मशाल यात्रा घेऊन आले होते.

प्रमुख वक्ते ॲड. परशुराम पवार म्हणाले, आपला समाज पुढे येण्यासाठी आपल्यालाच आता चार पावले पुढे यावे लागणार आहे. शिकून कायदे समजून घेऊन आपल्या हिताच्या बाबी समजून घेऊन आपल्याला मिळवाव्या लागतील. वनहक्क कायद्याच्या आधारे जंगलातील असलेल्या वनौषधी यांची वाढ करून येथील साधन संपत्तीचा योग्य प्रकारे उपयोग करून आपली आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक सुधारणा करता येऊ शकते हे स्पष्ट केले. या वेळी हुतात्मा नाग्या कातकरी यांचे वंशज विश्वनाथ नाईक यांचा स्मृतीचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला.



पान १ वरून

## बाळासाहेबांचे विश्वासू चम्पासिंह थापा यांनीही उद्धव ठाकरेंची साथ सोडली

याशिवाय बाळासाहेबांचे सेवेकरी असलेले मोरेश्वर राजे यांनीही मुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचे ठरविले आहे. वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्वाचे विचार जी व्यक्ती पुढे घेऊन जात आहे अशा व्यक्तीच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहणार असल्याचे या वेळी या दोघांनी सांगितले. उद्धव ठाकरे यांना हा एक धक्का आहे.

## रायगडात पावसाने वार्षिक सरासरी ओलांडली

सप्टेंबर महिन्यात पुन्हा एकदा पावसाने जोर पकडला आणि कसर भरून काढली. दरवर्षी जिल्ह्यात सप्टेंबरमध्ये ३८६ मिमी पाऊस पडतो, पण यंदा ५८२ मिमी पाऊस पडला आहे. त्यामुळे पावसाने वार्षिक ससासरी गाठली.

धरणक्षेत्रातही चांगला पाऊस पडला. लघुपाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत असलेल्या सर्व प्रकल्पांमध्ये सरासरीच्या ९८ टक्के पाऊस पडला आहे. पुनाडे, खैरे, रानवली, कार्ले धरणांचा अपवाद सोडला, तर इतर सर्व प्रकल्प १०० टक्के भरले आहेत.

**उत्तर रायगडात जास्त पाऊस**

यंदा दक्षिण रायगडच्या तुलनेत उत्तर रायगडात जास्त पाऊस पडला आहे. पेण, पनवेल, उरण, कर्जत या उत्तर रायगडातील तालुक्यांमध्ये शंभर टक्क्यांपेक्षा जास्त पाऊस पडला. त्या तुलनेत दक्षिण रायगडातील तळा व श्रीवर्धन या दोनच तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला आहे. नैसर्गिक आपत्तींचा तालुका म्हणून ओळखला जाणाऱ्या महाड तालुक्यात यंदा कमी पाऊस पडला आहे. महाड तालुक्याचे वार्षिक पर्जन्यमान ३४३४.२१ आहे, पण २६ सप्टेंबरपर्यंत ३०३० मिमी पावसाची नोंद झाली आहे. तालुक्यात आतापर्यंत पर्जन्यमानाच्या ८८.२३ टक्केच पाऊस पडला आहे. मागील वर्षी म्हणजेच २६ सप्टेंबर २०२१पर्यंत ३३२१ मिमी पाऊस पडला होता.

**पावसाची तालुकानिहाय टक्केवारी**

पेण १११, उरण ११०, पनवेल व कर्जत प्रत्येकी १०९, तळा १०५, खालापूर व श्रीवर्धन प्रत्येकी १०३, रोहा ९९, अलिबाग ९५.०७, पोलादपूर ९५.६०, मुरूड ९१.४१, माणगाव ९०.७३, म्हसळा ८९.१२०, महाड ८८.२३ टक्के, सुधागड ८६.३१.

# धुतूम ग्रामपंचायतीचा पुण्यात गौरव

**उरण : बातमीदार**

केंद्रीय ग्रामविकास व पंचायत राज विभाग तसेच महाराष्ट्र शासन ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या वतीने पुणे चिंचवड येथे राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या वेळी २८ राज्यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला होता. या राष्ट्रीय कार्यशाळेला महाराष्ट्र राज्यातून सहभाग घेण्याची सुवर्णसंधी धुतूम ग्रामपंचायतीला मिळाली. धुतूम ग्रामपंचायतीने घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या माध्यमातून केलेल्या स्वच्छतेच्या कामाची या कार्य शाळेमध्ये दाखविण्यात आली. त्याची दखल शासनाने घेतली व धुतूम ग्रामपंचायतीचा गौरव करण्यात आला. धुतूमच्या सरपंच रेश्मा ठाकूर, उपसरपंच शरद ठाकूर व सदस्यांनी केलेल्या कामाची स्तुती केली. या कार्यशाळेला धुतूम ग्रामसेवक विनोद मोरे यांनी सहभाग घेतला व त्यांना या कामाकरिता सन्मानित करण्यात आले. हा प्रकल्प यशस्वी करण्याकरिता आयओटिएल कंपनीचा मोठा सहभाग लाभला. तसेच जिल्हा, तालुका प्रशासनाचे मार्गदर्शन लाभले.







पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
मंगळवार, दि. २७ सप्टेंबर २०२२ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स

सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

# आरोग्यम् धनसंपदा

## पनवेलमधील मोफत शिबिराचा ५००हून नागरिकांनी घेतला लाभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सेवा पंधरवड्यानिमित्त भाजपच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहरातील नवनाथ मंदिर येथे रविवारी (दि. २५) आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य व नेत्र तपासणी आणि चष्मे वाटप शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या वेळी ५००हून अधिक नागरिकांनी मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घेतला त्यांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी आणि औषधे देण्यात आली. तसेच २६५ जणांना मोफत चष्मे वाटप झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती या काळात भारतीय जनता पक्षाच्यावतीने दिनांक १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरपर्यंत 'सेवात्मक', 'रचनात्मक', 'व्यक्तिमत्व आणि कर्तृत्व' अशा विविध सेवाकार्य असलेल्या 'सेवा पंधरवडा'चे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून हे आरोग्य शिबिर झाले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी या शिबिराला सदिच्छा भेट देऊन उत्कृष्ट आयोजनाबद्दल पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे कौतुक केले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी भाजपचे पनवेल शहर मंडल अध्यक्ष जयंत पगडे, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेविका सुशीला घरत, माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, मनोज भुजबळ, तेजस




कांडपिळे, ज्येष्ठ कार्यकर्ते जगदीश घरत, ज्येष्ठ कार्यकर्त्या ज्योती देशमाने, प्रभाग अध्यक्ष विजय म्हात्रे, रघुनाथ बहिरा, युवा नेते प्रतिक बहिरा, वैद्यकीय सेलचे जिल्हा सहसंयोजक डॉ. कृष्णा देसाई, गोपीनाथ लोखंडे, राकेश भुजबळ, अशोक आंबेकर, रावसाहेब खरात, चंद्रकांत मंजुळे, संजय जाधव, नागेश खंदारे, राहुल वाहुळकर, आनंद गुरव, रुपेश वाहुळकर, आनंद जाधव, विजय झिरे, सुनिल बगाडे, अमोल लहाने, पप्पु साळवे, राजु रत्नपारखे, अनिल बोटे, जरीना शेख, नंदा टापरे, आस्मा शेख, शांताराम कोळी, विलास इंगवले. संतोष ढगे यांच्यासह इतर कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली. या शिबिरासाठी अपोलो हॉस्पिटल नवी मुंबई, तेरणा मेडिकल कॉलेज नेरुळ, आधार हॉस्पिटल, सुश्रुषा हॉस्पिटल, उपजिल्हा रुग्णालय, नायर हॉस्पिटल, स्वाती ऑप्टिक्स यांचे सहकार्य लाभले. या वेळी शिबिरात सहभागी नागरिकांना पनवेल महापालिकेच्या वतीने बुस्टर लसीकरण झाले.

# माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियानाला पनवेलमध्ये प्रारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रात माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियान २६ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबरदरम्यान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा शुभारंभ पनवेल महापालिकेच्या आरोग्य केंद्र १ मध्ये माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या हस्ते करण्यात आला. पहिल्या दिवशी या केंद्रावर १०२ महिलांनी अभियानाचा लाभ घेतला. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत १८ वर्षांवरील महिला, माता, गरोदर स्त्रिया यांची सर्वांगीण तपासणी या दरम्यान पालिका क्षेत्रातील सर्व सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवरती करण्यात येत आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व महिलांनी या अभियानात सहभाग घ्यावा, असे आवाहन दर्शना भोईर यांनी या वेळी केले.

या वेळी वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, आरसीएच अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, वैद्यकिय अधिकारी डॉ. मनिषा चांडक यांच्यासह आरोग्य केंद्र १ मधील वैद्यकीय स्टाफ उपस्थित होता.

या अभियानांतर्गत आरोग्य केंद्रांवर महिला व बालकांची नावनोंदणी करून एमजीएम रुग्णालयात १८ वर्षांवरील सर्व महिला, माता, गरोदर स्त्रिया यांची आरोग्य तपासणी, प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.



# स्वप्नाली म्हात्रे यांना आदर्श मुख्याध्यापिका पुरस्कार जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कमल अ‍ॅण्ड ज्युनियर कॉलेजच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली संजय म्हात्रे यांना महात्मा गांधी जयंतीनिमित्त देण्यात येणारा आदर्श मुख्याध्यापिका महाराष्ट्र राज्य २०२२ हा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले आहे.



लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल अ‍ॅण्ड ज्यूनिअर कॉलजमध्ये मुख्याध्यापिका या नात्याने उत्कृष्टरित्या कार्य केल्यामुळे त्यांनी केलेले विविध कार्याची दखल घेऊन आदर्श मुख्याध्यापिका हा पुरस्कार स्वप्नाली म्हात्रे यांना जाहीर झाला आहे. शैक्षणिक विषय जनजागृती कार्यक्रम प्रशिक्षण संदर्भातील कार्यक्रम राबवुन समाजातील लोकांचा शिक्षण विषय व व्यक्तीमत्व विकास घडवुन आणण्यामध्ये आपले महत्वाचे योगदान असल्या कारणाने आपल्या कार्याची दखल घेत एआयएसएफ वैद्यकिय समितीने आपल्याला आदर्श मुख्याध्यापिका हा महाराष्ट्र राज्यस्तरीय पुरस्कार घोषीत केला आहे, असे पुरस्कार जाहीर करण्यात आलेल्या पत्रात नमुद केले आहे.

हा पुरस्कार २ ऑक्टोबर रोजी संभाजीनगर (औरंगाबाद) येथे खुलताबाद भद्रा मारोती भक्त निवास ट्रस्टच्या वतीने आयोजित कार्यक्रमात देण्यात येईल.

# पाले बुद्रुकमध्ये वृद्ध व्यक्तीची हत्या

**पनवेल :** अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून कोणत्यातरी धारदार हत्याराने एका ८० वर्षीय वृद्ध व्यक्तीची हत्या केल्याची घटना पनवेल तालुक्यातील पोयांजे कडून पाले बुद्रुक येथे जाणाऱ्या रस्त्यावर वालीचा डोह येथे घडली आहे.

पांडुरंग मऱ्या मते (वय ८०, रा. पोयंजे) असे या मयत वृद्ध व्यक्तीचे नाव असून त्याची कोणीतरी अज्ञात कारणावरून कोणत्यातरी धारधार हत्याराने त्यांच्या कपाळावर चेहऱ्यावर व डोक्याच्या पाठीमागे वार करून त्यांना जीवे ठार मारले आहे. त्यानंतर त्यांचा मृतदेह पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने वाहत्या पाण्यात टाकून दिला आहे.

या घटनेची माहिती मिळताच परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, सहाय्यक आयुक्त भागवत सोनावणे, वरिष्ठ निरीक्षक रवींद्र दौंडकर, निरीक्षक गुन्हे अंकुश खेडकर व त्यांचे पथक घटनास्थळी रवाना झाले आहेत. या घटनेची नोंद तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



**पनवेल : भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांची रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्यपदी निवड झाल्याबद्दल 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गव्हाण विद्यालयात आयोजित कार्यक्रमात त्यांचा सत्कार केला. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य महेंद्र घरत, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, प्राचार्य पी. जी पवार, उलवे येथील न्यू इंग्लिश स्कूलचे चेअरमन शरद खारकर, वसंत पाटील, किशोर पाटील, सुधीर ठाकूर, भार्गव ठाकूर, सुनील पाटील, अंकुश ठाकूर, व्ही. के. ठाकूर आदी उपस्थित होते.**




**पनवेल : जरी मरी मित्र मंडळ, शिवाजीनगर येथे नवरात्रोत्सवानिमित्त अ‍ॅड. राहुल अरुण घरत व प्रणाली राहूल घरत यांच्या हस्ते देवीचे पूजन करण्यात आले. या वेळी भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, शिवाजीनगर उपाध्यक्ष वामन ठाकूर, जरी मरी मित्र मंडळाचे कार्याध्यक्ष राम ठाकूर, अमित कडू, गजानन ठाकूर, प्रकाश ठाकूर, तुकाराम ठाकूर, विरेंद्र ठाकूर, महेश ठाकूर, नितिन ठाकूर, रमेश ठाकूर, पंकज ठाकूर, साईराम ठाकूर, दीक्षांत ठाकूर, विक्रम ठाकूर, शैलेश ठाकूर, नारायण ठाकूर, राजेंद्रकुमार ठाकूर, मोहन ठाकूर, शशिकांत ठाकूर, राजेंद्र ठाकूर, मंगेश ठाकूर, नंदा ठाकूर, कुसुम ठाकूर, आशा म्हात्रे, गुंजाबाई ठाकूर, जोमू ठाकूर, धर्मूबाई ठाकूर, ताराबाई ठाकूर, विठाबाई पाटील, लता ठाकूर, मनीषा ठाकूर, पुनम ठाकूर, उज्ज्वला ठाकूर, विनंती ठाकूर, राजश्री ठाकूर, कविता ठाकूर, सरस्वती ठाकूर, निता ठाकूर आदी उपस्थित होते.**



**पनवेल : जय बजरंग कला, क्रीडा सांस्कृतिक मंडळांच्या वतीने नवरात्रोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या वेळी वैभव घरत आणि शुभांगी घरत यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यंदा या नवरात्रोत्सवाचे १८वे वर्ष आहे. या वेळी गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, सुधीर ठाकूर, अनंता ठाकूर, भाऊ भोईर, काशिनाथ पाटील, मंडळाचे अध्यक्ष गजानन घरत, सुजाता पाटील, बी. टी. कांबळे, दामोदर भोईर, साईचरण म्हात्रे, रघुनाथ देशमुख, पी. के. घरत, राजू घरत, दयानंद घरत, पांडुरंग पाटील, नामदेव ठाकूर आदी उपस्थित होते.**

# पनवेलमध्ये नवरात्रोत्सवाचा 'झंकार'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मिडलक्लास सोसायटी मित्र मंडळ पनवेल आयोजित 'झंकार नवरात्रोत्सव २०२२' या नवरात्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी (दि. २६) घटस्थापना झाली असून भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व पत्नी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते देवीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.



सोमवारपासून ५ ऑक्टोबरपर्यंत पनवेल शहरातील मिडलक्लास सोसायटी मैदानावर रोज संध्याकाळी ७.३० वाजता लाईव्ह दांडिया नाईटचे आयोजन करण्यात आले आहे. यासह प्रत्येक दिवशी १०० विजेत्यांना आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. तर शेवटच्या दिवशी महाविजेत्याला 'स्कूटी' दुचाकी बक्षीस म्हणून देण्यात येणार आहे.झंकार नवरात्रोत्सव पनवेलमधील सर्वांत मोठा नवरात्रोत्सव मानला जातो. गेली १६ वर्षे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व नेतृत्वाखाली अत्यंत नियोजनबद्ध व शिस्तबद्धरित्या नवरात्रीचा उत्सव मोठ्या दिमाखात साजरा केला जातो. कोरोनामुळे गेली दोन वर्षे निर्बंध असल्यामुळे नवरात्रीचा सण साजरा करता आला नाही, मात्र यंदा कोरोनाने काढता पाय घेतल्यानंतर निर्बंधमुक्त नवरात्रोत्सव साजरा करण्यात येणार आहे. त्यामुळे नवरात्रोत्सव मंडळासह देवी भक्तांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

यावर्षी दांडिया रास गरब्यानिमित्त श्री स्वामी इव्हेंट्स प्रस्तुत 'एक्स्प्रेस दांडिया' या बहारदार लाईव्ह दांडिया नाईटचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात पार्श्वगायक/संगीतकार स्वप्नील गोडबोले, सुप्रसिद्ध गुजराती गायक हरीश ठक्कर, सुप्रसिद्ध गायिका कोमल तेंडुलकर, झी मराठी सारेगम फेम गायिका रुपाली वराडकर, सोनी मराठी वाहिनीवरील महाराष्ट्राची हास्यजत्रा या कार्यक्रमातील वादक श्याम बांगर, सुनील जाधव (बाबा), साहिल रेळेकर यांच्यासह संपूर्ण वादकांचा समूह दसऱ्यापर्यंत लाईव्ह दांडिया नाईटद्वारे प्रेक्षकांचे मनोरंजन करणार आहेत. तर महाराष्ट्राची हास्यजत्रा कार्यक्रमाचे संगीतकार अमीर हडकर हे स्वतः दसऱ्याला दांडिया नाईटमध्ये खास उपस्थित राहणार असून मनोरंजन करणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नूतन पाटील करणार आहेत. या सर्व कार्यक्रमांना सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन माजी सभागृह नेते परेश ठाकूर, एमसीसीएच सोसायटी अध्यक्ष राजू गुप्ते, एमसीसीएच सोसायटी मित्र मंडळाचे अध्यक्ष सुमीत झुंजारराव यांच्यासह मंडळाचे सर्व पदाधिकारी व कार्यकारिणीने केले आहे.

### विविध कार्यक्रमांची रेलचेल

***२६ ते २८ सप्टेंबर सायंकाळी ७.३० ते रात्री १० वाजेपर्यंत दांडिया रास, २९ सप्टेंबर सायंकाळी ७.३० ते रात्री १० वाजेपर्यंत 'रेट्रो/बॉलिवूड नाईट' या थीम वर आधारित वेशभूषा व नृत्य, ३० सप्टेंबर सायंकाळी ७.३० ते रात्री १२ वाजेपर्यंत पारंपरिक थीमवर (मराठी, गुजराती, राजस्थानी, पंजाबी इत्यादी) आधारित वेशभूषा व नृत्य, १ ऑक्टोबर सायंकाळी ७.३० ते रात्री १० वाजेपर्यंत समूह स्पर्धा, २ ऑक्टोबर सायंकाळी ७.३० ते रात्री १० वाजेपर्यंत फॅन्सी ड्रेस स्पर्धा, ३ ऑक्टोबर सायंकाळी ७.३० ते रात्री १२ वाजेपर्यंत कपल स्पेशल, ४ ऑक्टोबर सायंकाळी ७.३० ते रात्री १२ वाजेपर्यंत महाअंतिम स्पर्धा आणि ५ ऑक्टोबर सायंकाळी ७.३० ते रात्री १० वाजेपर्यंत दसरा साजरा करण्यात येणार आहे.***

# पनवेलमध्ये सेवा पंधरवड्यातील विविध प्रकरणांचा निपटारा करण्याच्या सूचना

**पनवेल : प्रतिनिधी**

शासनाच्या वतीने 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवड्याचे' १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. यात १० सप्टेंबरपर्यंत आलेल्या नागरिकांच्या सेवाविषयक प्रकरणांचा निपटारा करण्यात येत आहे. पनवेल महापालिकेच्या वतीने चारही प्रभागांमध्ये करण्यासाठी तक्रार निवारण कॅम्प महापालिकेच्या वतीने सुरू करण्यात आला असल्याची माहिती आयुक्त गणेश देशमुख यांनी दिली.



चारही प्रभागांमध्ये तक्रार निवारण कॅम्प महापालिकेच्यावतीने सुरू करण्यात आला आहे. शनिवार, रविवार सुटीच्यादिवशीही कार्यालये सुरू ठेऊन नागरिकांच्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात येत आहे.यामध्ये पनवेल महानगरपालिकेने निश्चित केलेल्या व नागरिकांशी प्रत्यक्ष निगडित असलेल्या विविध प्रकारच्या सेवा जसे की जन्मदाखला, मृत्यू दाखला, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, मालमत्ता नोंद प्रमाणपत्र, दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र, नवीन नळ जोडणी अशा सेवांचा समावेश होतो. तसेच आपले सरकार आणि पीजी पोर्टलवरील तक्रांरीचे निवारणही या पंधरावड्यांतर्गत करण्यात आले.नागरिकांच्या प्रत्यक्ष निगडित असलेल्या सेवा व तक्रारी अर्जांचे निराकरण करणे कामी सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आलेले आहे.

यासाठी आयुक्त गणेश देशमुख यांनी विभागप्रमुखांच्या बैठकित सर्व विभागप्रमुखांना नागरिकांच्या प्रत्यक्ष निगडित असलेल्या सेवा व तक्रारी अर्जांचा निपटारा करण्याच्या सूचना दिल्या आहेत. वैयक्तिक सेवेबाबतचे जे अर्ज १० सप्टेंबरपूर्वी दाखल झालेले आहेत, त्यांचा निपटारा महापालिकेच्या मालमत्ता विभाग, विवाह नोंदणी विभाग, पाणीपुरवठा विभाग, अशा विविध विभागामार्फत करण्यात येत आहे.

## संपादकीय

# दाल में कुछ काला है

शिवभोजन केंद्रे चालवणाऱ्यांना अनुदान करदात्यांच्या पैशातूनच दिले जाते हे वेगळे सांगायची गरज नाही. तेही ठीक होते. परंतु या संपूर्ण उपक्रमात काही तरी काळेबेरे असल्याची शंका आल्याने शिंदे-फडणवीस सरकारने संपूर्ण उपक्रमाची चौकशी करायचे ठरवले आहे. 'दाल में कुछ काला है' असा संशय घेण्याला नक्कीच जागा आहे.

**'देअर इज नो फ्री लंच इन धिस वर्ल्ड' अशी इंग्रजी भाषेमध्ये एक म्हण आहे. ही निव्वळ एक म्हण नव्हे तर अर्थशास्त्रातील सिद्धांतच आहे असे म्हटले पाहिजे. आपण जे अन्न खातो, त्याची कुठल्या ना कुठल्या स्वरुपात किंमत मोजावीच लागते हा त्याचा अर्थ. जगभरात कुपोषण आणि उपासमारीच्या विरोधात संयुक्त राष्ट्रांनी व्यापक मोहीम राबवली आहे. जगभरातील अनेक स्वयंसेवी संस्था तसेच काही समृद्ध देश या मोहिमांसाठी आर्थिक मदत देत असतात. उपाशी व्यक्तीला आपल्या ताटातील चतकोर भाकरी वाढावी ही तर भारतीय संस्कृतीच आहे. अन्नदानासारखे पुण्य नाही. तथापि हे अन्नदान सत्पात्री असावे लागते. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे ते स्वच्छ हातांनी आणि स्वच्छ मनाने द्यावे लागते. तेव्हाच त्याची गणना पुण्यकर्मात होते. सुमारे अडीच-पावणे तीन वर्षांपूर्वी महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर पाठोपाठ कोरोना विषाणूचे संकट ओढवले. कोरोना काळात लाखो कुटुंबांची परवड झाली. महाराष्ट्रात देखील स्थलांतरितांचे लोंढे आपण पाहिले. अडलेल्या नडलेल्या गरीबांसाठी ठाकरे सरकारने शिवभोजन थाळी उपलब्ध करून देण्याचा उपक्रम हाती घेतला. अवघ्या पाच रूपयांमध्ये संपूर्ण जेवण देण्याचा हा प्रयत्न चांगलाच होता. त्याला आक्षेप घेण्याचे काही कारणच नव्हते. पाच रूपयांत डाळ, भात, दोन चपात्या आणि भाजी असा चौरस आहार गरीबांना उपलब्ध झाला. त्याला कोणीही विरोध तेव्हा केला नाही. कोरोना काळानंतर हीच भोजन थाळी अवघ्या दहा रूपयांत सुरू ठेवण्यात आली. महाराष्ट्रातील शहर-गावांमध्ये आजही शिवभोजन थाळी देणारी केंद्रे सुरू आहेत. आजही जवळपास दीड लाख गरजू या थाळीवर गुजराण करतात असे दिसते. शिवभोजन केंद्रे चालवणाऱ्या खासगी व्यक्ती, संस्था आणि बचत गटांना प्रत्येक थाळीमागे सरकारतर्फे अनुदान दिले जाते. ग्रामीण भागांत प्रती थाळी ५५ रूपये तर शहर भागांत प्रती थाळी ३५ रूपये असे हे अनुदान आहे. हे अनुदान करदात्यांच्या पैशातूनच दिले जाते. परंतु या उपक्रमात काही तरी काळेबेरे असल्याची शंका आल्याने शिंदे-फडणवीस सरकारने उपक्रमाची चौकशी करायचे ठरवले आहे. ठाकरे सरकारने सत्तेवर आल्या-आल्या जलयुक्त शिवार योजना आणि व्यापक वनीकरण मोहिमेची चौकशी केली होती. या योजना तडकाफडकी बंदही केल्या होत्या. अर्थात चौकशीमध्ये काहीही निष्पन्न झाले नाही. उलटपक्षी या दोन्ही योजना अत्यंत लाभदायक असल्याचे नमूद करण्यात आले. शिंदे-फडणवीस सरकार मात्र शिवभोजन थाळीचा उपक्रम तडकाफडकी बंद करणार नाही. योजनेच्या चौकशीत काही काळेबेरे आढळल्यास वेगळा निर्णय घ्यावा लागेल हे मात्र उघड आहे. शिवभोजन थाळी हा जणु काही शिवसेनेचाच उपक्रम होता अशी जाहिरातबाजी करण्यात आली होती. प्रत्यक्षात करदात्यांच्या पैशातूनच राजकीय पोळी भाजून घेण्याचे काम चालले होते असा संशय आता व्यक्त केला जात आहे. चौकशीअंती सत्य बाहेर येईल. करदात्यांच्या पैशातून अन्नदान झाले की भ्रष्टाचार हे यथावकाश कळेलच.**

# महाडमध्ये मच्छी मार्केटला अस्वच्छतेचा विळखा

महाड नगर पालिका 'क' वर्गात असली तरी विविध सुविधा देण्यात पालिका अग्रेसर राहिली आहे. मात्र या सुविधांच्या देखभाल दुरुस्तीकडे महाड नगर पालिकेचेच दुर्लक्ष होत असल्याने अनेक सुविधांचे तीनतेरा वाजले आहेत. महाड शहरात असलेल्या मच्छीमार्केटची सद्यस्थितीत पुरती बिकट अवस्था झाली आहे. संपूर्ण मच्छीमार्केटला कचरा, दलदल, गवत आणि मासळीचे टाकाऊ भाग यांचा विळखा बसला आहे. यामुळे परीसरात दुर्गंधीचा अतिरेक झाला आहे. आसपास पडलेल्या कचऱ्यामुळे या परीसरात राहणाऱ्या नागरीकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

**खबरबात**
**महेश शिंदे**

महाड शहरात महाड नगर पालिकेने मासळी विक्रेत्यांकरीता स्वतंत्र इमारत उभी केली. सावित्री नदीकाठी हे मार्केट उभे राहिले आहे. यामुळे महाडकर आणि परिसरातील ग्रामीण भागातील नागरिकांना एकाच जागी मासळी खरेदीची सुविधा उपलब्ध झाली आहे. याठिकाणी मासळी खरेदीला कायम गर्दी दिसून येते, मात्र आत प्रवेश करण्यापूर्वीच तोंडावर रूमाल ठेवूनच आत प्रवेश करावा लागत आहे. इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळच मातीची दलदल आणि घाणीचे सम्राज्य पसरले आहे. मच्छी विक्रेते ओल्या मासळीचा कचरा जवळच टाकून देत आहेत. पालिकेकडून वेळेत कचरा उचलला जात नाही, अशी नागरिकांची तक्रार आहे. यामुळे याठिकाणी दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या मच्छीमार्केट परीसरातच मटण तसेच चिकण विक्रेतेदेखील यातील काही जण हे नदीकिनारीच कचरा टाकून देत आहेत.

महाड मच्छीमार्केटच्या इमारतीकरीता १९८७ रोजी जागा खरेदी होवून १९८८ च्या दरम्यान या इमारतीचे उद्‌घाटन करण्यात आले आहे. या मच्छीमार्केटमध्ये जवळपास २४ गाळे असले तरी सद्या केवळ सहाच विक्रेते बसत आहेत. यांच्याकडून महिन्याला केवळ १००० ते १५००० इतके भाडे वसूली केले जात आहे. महाडकरांसाठी ही उत्तम सुविधा असली तरी इमारतीच्या









छप्परावरील पत्रे फुटल्याने गळती लागली आहे. यामुळे पावसाचे पाणी इमारतीमध्ये गळत असल्याने विक्रेत्यांना आणि मासळी खरेदी करण्यास येणाऱ्या नागरिकांना इमारतीमध्ये छत्री उघडून उभे राहावे लागत आहे. पायाखालच्या लादीचे तुकडे तुकडे झाले असून या विक्रेत्यांना बसण्यास आणि त्यांचा माल ठेवण्यास देखील गोडावूनची उत्तम व्यवस्था नाही. महाड नगर पालिकेकडे स्वच्छता करण्यासाठी पाण्याची मागणी केली जाते, मात्र पाणीपुरवठा केला जात नाही असे एका विक्रेत्याने सांगितले. स्वच्छता करणारे कर्मचारी आणि कचरा उचलणारी गाडीदेखील इकडे फिरकत नाही. यामुळे इमारतीच्या परिसराला कचरा आणि दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. मच्छी मार्केटमध्ये सोयीसुविधा असाव्यात याकरिता कायम विक्रेत्यांकडून मागणी केली जाते, मात्र याकडे पालिकेचे दुर्लक्ष होत आहे. थातुरमातुर कामे करून केवळ मधाचे बोट दाखवण्याचे काम केले जाते असाही आरोप आहे. गळके पत्रे बदलण्याच्या मागणी केली जात आहे, मात्र याकडेदेखील दुर्लक्ष केले जात असल्याची खंत विक्रेत्याने व्यक्त केली. महाड शहरात रस्त्यावर बसणाऱ्या मच्छी विक्रेत्यांमुळे अस्वच्छता पसरत आहे. महाड नगर पालिकेचे मच्छीमार्केट असतानादेखील शहरात अनेक ठिकाणी मच्छीविक्रेते बसत आहेत. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई गोवा महामार्गावर चांभारखिंड, नवेनगर, छ. शिवाजी चौक, दादली पूल, गाडी तळ, या ठिकाणी मासळी विक्रेत्या महिला मासळी विकण्याचे काम करत आहेत. यामुळे शहरातील प्रमुख भागात दुर्गंधीचे वातावरण निर्माण होत आहे. २०१३मध्ये महाड नगर पालिकेने शहरातील इतर ठिकाणी बसणाऱ्या मच्छी विक्रेत्यांना याठिकाणी आणण्याची मोहीम राबविली होती, मात्र ती असफल ठरली.

एकीकडे महाड शहरात स्वच्छता मोहीम राबविली जाते तर दुसरीकडे याच मच्छी विक्रेत्यांमुळे दुर्गंधी आणि अस्वच्छता पसरत आहे. या रस्त्यालगत बसणाऱ्या मासळी विक्रेत्यांना मच्छी मार्केटमध्ये स्थलांतरित करणे आवश्यक आहे. या विक्रेत्यांमुळे मच्छी मार्केटमध्ये ग्राहक फिरकत नसल्याने गेली अनेक वर्ष व्यवसाय करणाऱ्या आणि पालिकेचे भाडे आणि कर भरणाऱ्या व्यवसायिकांना तोटा सहन करावा लागत अशीही नाराजी आहे.

### *रोगराईला निमंत्रण*

***मच्छीमार्केटच्या परीसरात अनेक रहीवाशी आहेत. याठिकाणी अशा प्रकारे होणारी दुर्गंधी रोगराईला निमंत्रण देणारी असून परीसरातील नागरीक या दुर्गंधीने त्रस्त झाले आहेत. देशात भारत स्वच्छता अभियान राबविले जात असताना महाड नगर पालिकेच्या हद्दीतील या मच्छीमार्केटचा परीसर मात्र अस्वच्छतेने आणि दुर्गंधीने व्यापला आहे. ओल्या मासळीचा, मटण, चिकनचा कचरा याच ठिकाणी पडत असल्याने परीसरात अस्वच्छतेचे साम्राज्य आहे. महाड नगर पालिकेने या इमारतीची दुरूस्ती आणि परीसर स्वच्छतेबाबत कार्यवाही करावी अशी मागणी स्थानिक नागरीकांतून आणि महाडकरांतून व्यक्त होत आहे.***



## बदलते तंत्रज्ञान

# हवामानाचा अंदाज एका क्लिकवर; ॲपची घ्या माहिती



ऋतूचक्रानुसार मान्सूनचे चार महिने संपत आले असताना, पावसाने पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. अशात दररोज कामानिमित्त बाहेर पडणाऱ्यांना याचा फार त्रास होतो. तसेच पावसामुळे सर्दी, ताप असे आजार लगेच पसरतात. या सर्व त्रासापासून सुटका मिळविण्यासाठी जर मुसळधार पाऊस येणार असेल तर त्याचा अंदाज आपल्याला असेल, तर तशी तयारी करून बाहेर निघू किंवा अशावेळी बाहेर जाण्याचे टाळू असे आपल्याला वाटते. ही माहिती जर तुम्हाला आधीच मिळवायची असेल तर काही ॲप्स तुमची मदत करू शकतात.

हवामानाचा अंदाज वर्तवणारे अनेक ॲप्स उपलब्ध आहेत, पण त्यातील सर्वात उत्तम आणि लोकप्रिय ॲप्स कोणते आहेत जाणून घेऊया. हवामानाचा अंदाज वर्तविणारे सर्वोत्तम ॲप्स अँड्रॉइडवर उपलब्ध आहे. याला पाच पैकी ४.७ स्टार रेटिंग मिळाले आहे. आत्तापर्यंत एक लाखांहून अधिक जणांनी हे ॲप डाउनलोड केले आहे. यामध्ये तुम्हाला हवेच्या गुणवत्तेपासून दररोजचे हवामान अशा प्रकारची माहिती दिली जाईल. हे ॲप फ्रीमध्ये डाउनलोड करता येते. प्ले स्टोरवर या ॲपला ४.६ रेटिंग आहे. ५० लाखांहून अधिक जणांनी हे ॲप डाउनलोड केले आहे. हे ॲप तुम्हाला रिअल टाइम हवामान रडार देते. तसेच यामध्ये लोकल आणि नॅशनल असे पर्याय देण्यात आले आहेत. इथून दर तासाला हवामान कसे असेल याची माहिती मिळू शकते. हे ॲप फ्री डाउनलोड करता येते. याला ४.२ रेट केले गेले आहे. पाच कोटींहून अधिक जणांनी हे ॲप डाउनलोड केले आहे. यामध्ये हवामान थेट रडार नकाशे, मान्सून पावसाचा अंदाज, फार्म वेदर, सात ते चौदा दिवसांचा लोकल वेदर फोरकास्ट यासारखी वैशिष्ट्ये दिली आहेत. तुम्ही हे ॲप फ्री डाउनलोड करू शकता. बऱ्याचदा आपल्या मोबाइलवर अनेक ॲप मिळू शकतात आणि ते उपयुक्त असतात. मात्र ते आपल्या माहित नसतात. यामुळे आपण बरीच माहिती घेण्यापासून दूर राहतो. मोबाइल वापरकर्त्यांनी सर्व माहिती यासाठी जाणून घेतली पाहिजे.

# प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व अनुताई वाघ

अनुताई वाघ यांचे जीवन अनेक प्रकारांने प्रेरणादायी आहे. अनुताई बालकृष्ण वाघ यांचा जन्म मोरगाव, पुणे येथे १७ मार्च १९१०रोजी झाला. अनुताई वाघ यांनी आदिवासी समाजासाठी काम करणाऱ्या समाजसेविका व शिक्षणतज्ज्ञ होत्या. अनुताई बालकृष्ण वाघ यांनी शिक्षणाद्वारे आदिवासींच्या जीवनात जागृती निर्माण करण्याचे काम केले. पालघर जिल्ह्यातील कोसबाड येथे ताराबाई मोडक यांच्यासोबत अनुताईंनी बालशिक्षणाचे कार्य केले. त्यांच्या एकूणच जीवनपटाचा घेतलेला हा आढावा.

**निमित्त**



अनुताई बालकृष्ण वाघ यांनी आदिवासी समाजासाठी मोठे काम केले आहे. त्या ज्येष्ठ समाजसेविका व शिक्षणतज्ज्ञ म्हणून ओळखल्या जात होत्या. त्यांनी शिक्षणाद्वारे आदिवासींच्या जीवनात जागृती निर्माण करण्याचे महान काम केले आहे. बालशिक्षणात त्यांनी स्वत:ला वाहून घेतले होते. अनुताईंचे वडील बालकृष्ण वाघ हे सार्वजनिक बांधकाम खात्यात नोकरीस होते. वयाच्या तेराव्या वर्षी म्हणजे १९२३ साली शंकर वामन जातेगावकर यांच्याशी अनुताईंचा विवाह झाला. परंतु सहा महिन्यांतच त्यांना वयाच्या तेराव्या वर्षी वैधव्य आले. असे असूनसुद्धा तत्कालीन सामाजिक रूढींचे बंधन झुगारून त्यांनी शिक्षण घेतले व शिक्षिका म्हणून काम करीत असताना त्यांना ताराबाई मोडक भेटल्या आणि त्यांनी ताराबाईंच्या बोर्डी (ठाणे) येथे आदिवासींसाठी असलेल्या ग्राम बाल शिक्षण केंद्रात प्रवेश केला व तेथे १९४७ ते १९९२ अशी ४७ वर्षे त्यांनी निरपेक्ष वृत्तीने ग्रामशिक्षणाचे कार्य चालविले.

पुढे कोसबाडच्या नूतन बाल शिक्षण केंद्राच्या चालक, राष्ट्रीय शिक्षण अनुसंधान व प्रशिक्षण मंडळाच्या कार्यकारिणी सदस्य, अखिल भारतीय पूर्व प्राथमिक शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले. त्यांचे शिक्षणविषयक ग्रंथ इंग्रजी, हिंदी, गुजराथीतून अनुवादित झाले. प्रबोधनासाठी वाहिलेल्या शिक्षणपत्रिका व स्त्रीजागृतीसाठी असलेल्या 'सावित्री' मासिकाच्या त्या संपादिका होत्या. कोसबाडच्या टेकडीवर आदिवासींच्या उन्नतीसाठी एक संस्था स्थापन केली. या संस्थेलाच 'कोसबाड प्रकल्प'म्हणून ओळखले जाते. आदिवासींच्या शिक्षणासाठी पाळणाघरे, बालवाड्या, प्राथमिक शाळा, प्रौढ शिक्षण वर्ग, बालसेविका ट्रेनिंग कॉलेज आदि शैक्षणिक संस्था सुरू केल्या. त्यांना भारताच्या केंद्र सरकारतर्फे साक्षरता प्रसारार्थ अनुताईंनी लिहिलेल्या सहजशिक्षण या पुस्तकास १९८१ साली राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले.

१९२९ ते १९३३ च्या दरम्यान अनुताई नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यातील एका गावातील शाळेत शिकवत होत्या. हे सोपे नव्हते. मुलींना शिक्षण देण्यास तीव्र विरोध झाला आणि अनुताईंना बऱ्याच शत्रुत्वाचा सामना करावा लागला. पण त्यांनी चिकाटी धरली. त्यांनी स्त्री आणि पुरुष असा भेद करण्यास नकार दिला

आदिवासींच्या शिक्षणासाठी अनेक संस्था स्थापन करून आयुष्य वेचणाऱ्या या अनुताईंना आदर्श शिक्षिका, दलितमित्र, आदर्श माता, फाय फाऊंडेशन, सावित्रीबाई फुले, बाल कल्याण राष्ट्रीय पुरस्कार, जमनालाल बजाज पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांबरोबरच शासनाने पद्मश्री देवून सन्मानित केले गेले. त्यांचे २७ सप्टेंबर १९९२मध्ये कोसबाड येथे निधन झाले.



# सलाम नारीशक्तीला!

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता: अर्थात जिथे नारीचा सन्मान केला जातो तिथेच देव रमतात. आदी युगात भारतीय स्त्रीला आदीशक्ति असे संबोधित करण्यात आले आहे. स्त्री असेल तर जगाची उत्पत्ती आहे. स्त्री ही केवळ शक्तीचेच नव्हे तर प्रेम, दया, करुणेचे प्रतिक आहे. कलियुगात स्त्रियांवर अन्याय, अत्याचार झाले. त्यामुळे स्त्रीचे चारित्र्य हणन होण्यास सुरुवात झाली. सामान्य घरातील स्त्रियांचे रक्षण करणे कुटुंबाला, समाजाला जोखमीचे वाटू लागले. भ्रूणहत्या होण्यास सुरुवात झाली, परंतु कालांतराने स्त्री हक्काविषयी, शिक्षण विषयी जनजागृती करण्यात आली. त्याकरिता महात्मा जोतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मोलाचा वाटा आहे. कायदा व सुव्यवस्थेची भर, वेळोवेळी प्रशासनानेही स्त्रियांना आत्मनिर्भर होण्याकरिता, समाजामध्ये खंबीरपणे आपली ओळख निर्माण करण्यासाठी, सक्षमीकरण करण्यासाठी अनेक शासकीय योजना राबविण्यास सुरुवात केली. आता स्त्रिया स्वतःला समाजामध्ये स्थान मिळवून नवीन उंची मिळवत आहेत. सौंदर्य हीच संकल्पना स्त्रियांमध्ये मर्यादित न राहता त्यावर आता कर्तृत्वाचे तेज झळकते आहे. अशा सर्व माता, भगिनी, सखींना, त्यांच्या कर्तृत्वाला नवरात्रोत्सवानिमित्त मानाचा मुजरा.

**-शितल चोले, डायटीशियन, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन**

## आरोग्य प्रहर

# आळसपणासह 'या' सवयी टाळा; अन्यथा धोका!

जीवनशैलीमध्ये आणि खाण्यापिण्याच्या सवयींमुळे बदल केल्यास मधुमेहापासून बचाव होऊ शकतो. तसेच, काही सवयी या मधुमेह होण्यास कारणीभूत ठरू शकतात. या सवयींबद्दल माहिती असणे गरजेचे आहे. आज या सवयींबद्दल जाणून घेऊया. देशात मधुमेहाच्या रुग्णांची संख्या वाढतच आहे. डॉक्टरांच्या मते चुकीची जीवनशैली ही मधुमेहांचे रुग्ण वाढण्यामागचे कारण आहे. टाईप एक मधुमेह हा अनुवंशिक आहे, मात्र टाईप दोन मधुमेह हा अयोग्य आहार आणि जीवनशैलीमुळे होतो. मात्र जीवनशैलीमध्ये आणि खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये बदल केल्यास मधुमेहापासून बचाव होऊ शकतो. तसेच, काही सवयी या मधुमेह होण्यास कारणीभूत ठरू शकतात.



शरीरात पोषक तत्वांची कमी झाल्यास केवळ मधुमेहच नव्हे तर इतर आजारही होऊ शकतात. फळे आणि हिरव्यागार पाले भाज्या न खाणाऱ्यांना मधुमेहाची समस्या होऊ शकते. त्याचबोरबर, दीर्घ कालावधीपर्यंत जीवनसत्व ब च्या कमतरतेने देखील मधुमेह होऊ शकतो. प्रोटीन, फायबर, हेल्दी फॅट आणि कार्बोहायड्रेटनी युक्त आहार घेतल्यास इन्सुलिनची पातळी आणि रक्तातील साखर नियंत्रणात राहू शकते. बरेच जण व्यायाम करत नाहीत. व्यायाम केल्याने श्वासोच्छवास प्रक्रिया चांगली राहाते. अनुवंशिक मधुमेह असलेल्यांना व्यायाम फायदेशीर ठरू शकतो. व्यक्तीने आठवड्यातून कमीत कमी १५० मिनिटे किंवा पाच दिवस व्यायाम केला पाहिजे असे मानले जाते. आळशी जीवनशैली हे पण आरोग्य चांगले न राहण्याचे कारण आहे. जे लोक क्रियाशील राहात नाहीत किंवा नेहमी लेटून असतात त्यांना मधुमेह होऊ शकतो. दीर्घकाळ निष्क्रिय राहिलेल्या व्यक्तीला हृदय आणि फुफ्फुसाची समस्या होऊ शकते. त्यामुळे आळस दूर करा आणि क्रियाशील राहा, असे केल्यास मधुमेहापासून बचाव होऊ शकतो.

उच्च कॅलरी असलेल्या आहाराचे सेवन करतात. उच्च कॅलरीयुक्त आहाराच्या सेवनाने शरीरात चरबी वाढते, तसेच टाईप दोन मधुमेह होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे जेवढी कॅलरी तुम्ही बर्न करू शकता, तेवढीच कॅलरीचे सेवन झाले पाहिजे. कमी कॅलरी असलेल्या आहाराचे सेवन केले पाहिजे. हृदयविकार, उच्च कोलेस्टेरॉल, उच्च रक्तदाब आणि मधुमेह यांसारखे आजार धुम्रपान आणि मद्यपान केल्याने होऊ शकतात, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. येथे देण्यात आलेली माहिती काही ज्ञानावर आहे. यासाठी तज्ज्ञांचा सल्ला घ्या.

# रायगडात घटस्थापना उत्साहात

## रोह्याचे ग्रामदैवत श्री धावीर महाराज देवघटी बसले



**धाटाव : प्रतिनिधी**

देशात ज्या दोन देवस्थानांना पोलीस मानवंदना देण्याची प्रथा, परंपरा आहे, त्यापैकी एक रोह्याचे ग्रामदैवत श्री धावीर महाराज सोमवारी (दि. २६) मंगलमय वातावरणात घटी बसले आणि महाराजांच्या नवरात्रोत्सवास मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. या वेळी गोंधळ्यांची आरती, विविध वाद्य आणि घंटानादात ग्रामदैवताची महाआरती करण्यात आली.

रोहा शहराच्या पश्चिम बाजुला हनुमान टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या सुंदर आणि भव्य मंदिराच्या गाभाऱ्यात श्री धावीर महाराज, कालिका माता, बहिरीबुवा वाघबाप्पा मागे तीनवीरा यांचे स्थान आहे. व मंदिराबाहेर महाराजांचा अंगरक्षक चेडा देवाचे स्थान आहे.

विश्वस्थ मंडळाचे अध्यक्ष प्रशांत देशमुख, कार्यवाह मकरंद बारटक्के, उत्सव समितीचे अध्यक्ष शैलेश कोळी, सरचिटणीस भुषण भादेकर, माजी नगराध्यक्ष लालताप्रसाद कुशवाह, समीर शेडगे, विश्वस्त नितिन परब, विजयराव मोरे, आप्पा देशमुख, सुभाष राजे, समीर सकपाळ, प्रकाश पवार, महेश सरदार, संदीप सरफळे, अमित उकडे, शैलेश रावकर, निलेश शिर्के, रवींद्र चाळके, सूर्यकांत कोलाटकर, प्रकाश पाटणकर, दत्ता जगताप, चंद्रकांत पार्टे, सचिन चाळके, अजित मोरे, रमेश साळवी, भालचंद्र पवार आदींसह उत्सव समितीचे पदाधिकारी, प्रमुख मान्यवर या वेळी उपस्थित होते. उत्सवानिमित्त मंदिराचा परिसर विविधरंगी फुलांनी सजविण्यात आले आहे.

## रोह्यात विविध ठिकाणी देवींची प्रतिष्ठापना, भाविकांत उत्साह




**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील अनेक सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळांनी सोमवारी (दि. २६) रोहा शहरातून देवींची मिरवणूक काढून ठिकठिकाणी देवींची उत्साहात स्थापना केली.

रोहा तालुक्यातील भातसई येथील महादेवी, पडम येथील मरुआई, जाखमाता यासह अन्य ठिकाणी असलेल्या मातांच्या उत्सवाला सोमवारपासून मोठ्या भक्तीभावाने सुरुवात झाली. रोहा पोलीस ठाणे हद्दीतील २९ पैकी २५ सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळांनी सोमवारी देवीची स्थापना केली आहे. तर १२ ठिकाणी घट मांडण्यात आले. याचबरोबर प्रत्येक कुटुंबाने आपल्या कुलदैवताची पुजाअर्चा केली.

कोलाड पोलीस ठाणे हद्दीत २७ सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळांनी देवींची स्थापना केली आहे. नऊ नवरात्रौत्सव मंडळांनी दवीच्या प्रतिमा लावल्या आहेत. सात ठिकाणी घट मांडण्यात आले आहेत.

## रसायनीत बजरंग दलाच्या तीन शाखांचे उद्घाटन



**खोपोली : प्रतिनिधी**

घटस्थापनेच्या मुहूर्तावर सोमवारी (दि. २६) रसायनी प्रखंडातील मोहोपाडा, आळी, आंबिवली, सिद्धश्वर कॉर्नर येथे बजरंग दलाच्या शाखांचे उदघाटन संयोजक विवेक कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी विवेक कुलकर्णी, हभप संतोष महाराज सते यांनी मनोगत व्यक्त केले.

बजरंग दलाचे कोकण प्रांत संयोजक संदीप भगत, रायगड जिल्हा धर्माचार्य प्रमुख हभप महादेव महाराज मांडे, हभप वामन महाराज भोईर, हभप काशीनाथ महाराज लबडे, विश्व हिंदू परिषद कुलाबा जिल्हा मंत्री रमेश मोगरे, सहमंत्री दत्ताजी सुर्वे, बजरंग दल सहसंयोजक सुभाष कडव, संजय उल्वेकर, गुरुनाथ मुंबईकर, साईनाथ श्रीखंडे, आदि मान्यवर उपस्थित होते. या वेळी सेबी रोड ते मोहोपाडा अशी रॅली काढण्यात आली होती.

बजरंग दलाचे जनार्दन मालुसरे, प्रशांत तांबोळी, मतेश गुडसे, नंदकुमार गोगडे, दिनेश पडवळ, अजय गिरी, कैलास पाटील, आदित्य सोमन, राजेंद्र जांबुळकर, अभिषेक पांडे, एकनाथ जांबुळकर, प्रदीप पाटील, संतोष जाधव, ज्ञानेश्वर साळुंखे, रतन रजपुत, केतन जाधव, विश्वनाथ पुजारी, अशोक मुंडे, फरांदे, नयन ठाकूर आदी कार्यकर्त्यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता विशेष परिश्रम घेतले.

## किल्ले रायगडावरील विविध विधींवर शिवप्रेमींमध्ये नाराजी

**महाड : प्रतिनिधी**

**युवराज संभाजीराजे भोसलेंकडून मुख्यमंत्र्यांना पत्र**

किल्ले रायगडावर गेली कांही वर्षात विविध धार्मिक विधी होत असल्याचे उघड झाले असून शनिवारी किल्ले रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळी पिंडदान होत असल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. हा प्रकार संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी थांबविला. दरम्यान, अशा प्रकारच्या विधींना अटकाव केला जावा, अशी मागणी युवराज संभाजीराजे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना एका पत्रान्वये केली आहे.

किल्ले रायगडावर आता शिवराज्याभिषेक दिन, शिवजयंती, शिवपुण्यतिथी अशा कार्यक्रमांना लाखो शिवभक्त दाखल होतात. छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असलेल्या या किल्ले रायगडावर आता विविध धार्मिक विधींची भर पडू लागली आहे. कांही महिन्यांपूर्वी राख सदृश्य पावडर आणि पुस्तक पूजनाचा विधी केला जात असताना काही महिलांनी हा प्रकार रोखला होता. या घटनेला काही महिनेच उलटत नाहीत तोच पुन्हा एकदा शिवसमाधीस्थळी पिंडदान केले जात असल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला. याबाबत युवराज संभाजीराजे भोसले यांनी नाराजी व्यक्त करत, अशा विधींवर अटकाव केला जावा, अशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे आहे. त्याचबरोबर शिवसमाधीस्थळी अभिवादनाव्यतरिक्त कोणतेच विधी केले जावू नयेत, याबाबत गृह मंत्रालय आणि पुरातत्व विभागाने उपाययोजना करावी अशी मागणी केली आहे.

## पेणमध्ये हुतात्मा नाग्या कातकरी यांना अभिवादन

**पेण : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या चळवळीत आदिवासींचाही सहभाग होता, ही बाब आदिवासीच्या अस्मितेच्या चळवळीने पुढे आणली आहे, ही अभिमानास्पद गोष्ट अंकूर ट्रस्टच्या कार्याची पावती देते, असे प्रतिपादन पेणचे उपविभागीय अधिकारी विठ्ठल इनामदार यांनी काढले.



चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या स्मृतिदिनानिमित्त पेण येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी इनामदार बोलत होते. ज्येष्ठ सामाजिक कार्यकत्या डॉ. वैशाली पाटील, आदिवासी प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे, पुरवठा अधिकारी थळे, नायब तहसीलदार आदी या वेळी उपस्थित होते.

या कार्यक्रमात आदिवासी प्रकल्प कार्यालयामार्फत भाजीपाला लागवड व लघु व्यवसायासाठी धनादेश वाटण्यात आले. तसेच पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांकडून रेशनकार्डचे वाटप करण्यात आले. प्रकरण अधिकारी शशिकला अहिरराव, आदिवासी युवा नेते संजय नाईक, गणेश वाघमारे, संतोष पवार, स्नेहल पवार यांनी मनोगत व्यक्त केले. तत्पुर्वी हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या प्रतिमेची पेण शहरात भव्य रॅली काढण्यात आली होती. या वेळी हुतात्म्यांना सार्वजनिकरित्या मानवंदना देण्यात आली.




**महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या ३३व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते दीपस्तंभ पुरस्कार २०२२ स्वीकारताना आदर्श नागरी सहकार पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश पाटील, उपाध्यक्ष सतीश प्रधान, संचालक अनंत म्हात्रे, अभिजित पाटील.**

## मुरूडमध्ये सर्पमित्राकडून नागिणीला जीवदान

**मुरूड : प्रतिनिधी**

नांदगाव येथील मयूर शेमबेकर यांच्या निवासस्थानी तीन दिवस मुक्काम ठोकलेली चार फूट लांबीची नागीण पकडण्यात सर्पमित्र संदीप घरत यांना यश आले.

आपल्या घरात नागीण असल्याची माहिती मयूर शेमबेकर याने सर्पमित्र संदीप घरत यांना दिली. घरत यांनी या ठिकाणी जावून नागिणीचा शोध घेतला. घरातील प्रत्येक वस्तू बाजूला केल्यावर शिलाई मशीनच्या प्लास्टिक कव्हरमध्ये ही नागीण आढळून आली. शिलाई मशीनच्या वरच्या बाजूस उंदरांनी घर केले होते. या उंदरांना खाण्यासाठी नागीण मयूर याच्या घरात शिरली होती. घरातील लोकांच्या निदर्शनास नागीण येताच त्यांनी सर्पमित्र संदीप घरत यांना बोलावले. घरत यांनी या नागिणीस पकडून वन कर्मचाऱ्यांच्या मदतीने वन विभागाच्या हद्दीत सोडले.

### ग्राम पंचायत वडघर
### ता. पनवेल, जि. रायगड

**महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम १९५९) कलम १२९ तसेच महाराष्ट्र ग्राम पंचायत कर व फी नियम (शुल्क) १९६०**

याव्दारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्ताचे वडघर ग्राम पंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नांवात बदल/विभाजन करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून, त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**ट्रान्सफर**

| अ. क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नांव | मालमत्ता देणाऱ्यांचे नांव | मालमत्ता वर्णन | दस्त ऐवजाचा अनुक्रमांक/दिनांक |
|---|---|---|---|---|
| ०१ | शेख रुखसाना हजर अली पत्ता- पात्र चाळ झोपडी ग्राउंड फ्लोअर रुम नं.८, नवरोजी हिल रोड नं. डोंगरी बाबू बिल्डींग मुंबई. | काशिफ इकबा दिवान पत्ता-पटेल मोहल्ला, पनवेल. | सदनिका क्रमांक- १०२, पहिला मजला सी फेस घर नं. २२ वडघर, पनवेल. क्षेत्रफळ २७२ चौ. फुट | दस्त क्रमांक- २९४४/२०२१ दु.नि. पनवेल-१, दिनांक-१८.०३.२०२१ |
| ०२ | कौसर युनूस दिवान पत्ता- १०८/ब पटेल. मोहल्ला जामा मस्जिद पळसदरी पनवेल | काशिफ इकबा दिवान पत्ता-पटेल मोहल्ला, पनवेल. | सदनिका क्रमांक- १०३, पहिला मजला सी फेस घर नं. २२ वडघर, पनवेल. क्षेत्रफळ-२२२ चौ. फूट बिल्डप | दु.नि. पनवेल-१, दिनांक - २०२१ |

वरील बाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार वडघर ग्राम पंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल/विभाजन करणेचे प्रस्ताव विचारधीन असून, याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास, सदर नोटीसीच्या प्रसिध्दीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्राम पंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमुद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नांवात बदल करणेत आले नंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम १९५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पुर्ण करण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(नंदकिशोर कृष्णा भगत)**
**ग्राम विकास अधिकारी**
**ग्राम पंचायत वडघर**

**सही/-**
**(मुकेश नारायण कांबळे)**
**प्रशासक**
**ग्राम पंचायत वडघर**

## कोकण ज्ञानपीठ फार्मसी महाविद्यालयात जागतिक फार्मासिस्ट दिन साजरा




**कर्जत : प्रतिनिधी**

कोंकण ज्ञानपीठाच्या कर्जत येथील राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात जागतिक फार्मासिस्ट दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी नासाचे वैज्ञानिक डॉ. मुरलीधर राव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

फार्मसी महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. मोहन काळे यांनी महाविद्यालयाचा आलेख सादर केला. डॉ. मुरलीधर राव यांनी 'मदर अर्थ इन आय सी यु' आपण तिला बाहेर आणूया' या विषयावर आयोजित चर्चासत्रात २०१३मध्ये केदारनाथ हिमनदी फुटल्याचे उदाहरण देऊन सत्राची सुरुवात केली. त्यांनी ग्रीनहाऊस इफेक्ट, ग्लोबल वार्मिंग, कीलिंग कर्व या संकल्पना स्पष्ट केल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. तनिष्का ठाकरे यांनी केले. संस्थेचे खजिनदार प्रदीप श्रृंगारपुरे, सदस्य झुलकरनैन डाभिया, महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे, डॉ. भरत टेकाडे, पूनम पाटील, अनुजा जगदाळे, सतनाम खेमानी, प्रतीक्षा साबळे आदींसह शिक्षक व विद्यार्थी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शुध्दीपत्रक
### ग्रामपंचायत आकुर्ली
### ता. पनवेल, जि. रायगड

**संदर्भ - मुंबई ग्रामपंचायत अधिनियम ८ नियम ३२ (१)**

| | |
|---|---|
| ४ बेलमॅक रिव्हरसाईड स्काय ४०९/ए/२०१ | ४ बेलमॅक रिव्हरसाईड स्काय ४०९/ए/१०१ असे वाचावे |
| ३७ अर्चना सदिय ठाकुर | ३७ अर्चना संदिप ठाकुर असे वाचावे |
| ६८ रोहित जयंत तेंडूळकर | ६८ रोहित जयंत तेंडूलकर असे वाचावे |

दिनांक : २७/०९/२०२२
ठिकाण : आकुर्ली, पनवेल

**सही/-**
**स्वप्नील व्यंकट जाधव**
बी.ए. एलएल.बी.
**वकील उच्च न्यायालय**

**कार्यालय** : ०२/बी विंग, श्री दत्तराज सोसायटी, जुने तहसील कार्यालया समोर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६

### ग्राम पंचायत वडघर
### मु. वडघर, ता. पो. पनवेल, जि. रायगड.
### जाहिर निविदा

**वडघर** ग्राम पंचायत हद्दीतील खालील विकास कामे करण्याकरीता विहीत मुदतीमध्ये नोंदणीकृत ठेकेदारांकडून मोहोरबंद पाकिटात निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म मिळण्याची मुदत | निविदा फॉर्म स्विकारण्याची अंतिम मुदत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वडघर बौध्दवाडी मराठी शाळा येथे पाणी पुरवठा योजना करणे. | २०००००/- | २०००/- | ३०/०९/२०२२ दुपारी ३.०० वाजेपर्यंत | ०४/१०/२०२२ दुपारी ३.०० वाजेपर्यंत | |
| २ | वडघर बौध्दवाडी येथील तीन शिट शौचालय दुरुस्ती करणे. | २०००००/- | २०००/- | ३०/०९/२०२२ दुपारी ३.०० वाजेपर्यंत | ०४/१०/२०२२ दुपारी ३.०० वाजेपर्यंत | |
| ३ | वडघर बौध्दवाडी समाजमंदीराकरीता एक खोली बांधणे. | २०००००/- | २०००/- | ३०/०९/२०२२ दुपारी ३.०० वाजेपर्यंत | ०४/१०/२०२२ दुपारी ३.०० वाजेपर्यंत | |
| ४ | वडघर बौध्दवाडी वाचनालयाकरीता एक खोली बांधणे. | २५४४१०/- | २५४४/- | ३०/०९/२०२२ दुपारी ३.०० वाजेपर्यंत | ०४/१०/२०२२ दुपारी ३.०० वाजेपर्यंत | |

**अटी व शती खालिल प्रमाणे :**

१. वरील कामाच्या निविदा मोहोरबंद पाकिटात **मा. प्रशासक, ग्राम पंचायत वडघर** यांचे नावे दिनांक ०४/१०/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत ग्राम पंचायत कार्यालयात स्विकारण्यात येतील.
२. ठेकेदार नोंदणीकृत असावा.
३. कोणतीही एक किंवा सर्वच निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखुन ठेवला आहे.
४. ग्राम पंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दिनांक ०४/१०/२०२२ रोजी सायंकाळी ठिक ०४.०० वाजता मा. प्रशासक सो. यांचे समक्ष ग्राम पंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.
५. कोणत्याही नामंजूर निविदेसंदर्भात संबंधित ठेकेदारांस कुठलाही पत्र व्यवहार केला जाणार नाही,
६. सदर कामांचे अंदाजपत्रक ग्राम पंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

**ठिकाण: वडघर,**
**दिनांक : २३/०९/२०२२.**

**सही/-**
**(नंदकिशोर कृष्णा भगत)**
**ग्राम विकास अधिकारी**
**ग्राम पंचायत वडघर**

**सही/-**
**(मुकेश नारायण कांबळे)**
**प्रशासक**
**ग्राम पंचायत वडघर**

### रयत शिक्षण संस्थेचे,
### महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल
### ता. पनवेल, जि. रायगड
### निविदा सूचना

महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या 'प्रेरणा' नियतकालिकाच्या छपाईकरिता खालील तपशीलानुसार निविदा मागवित आहोत.

साईज : '८.५ X ११.२९' (ए४) (२९ X २१ सीएम )

एकूण नग : १५००

| अ.क्र. | तपशील | पेपर प्रत | संख्या | पेपर (दर) | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | कव्हर छपाईसह लॅमिनेशन | ३०० आर्ट पेपर डी.टी.पी.व डिझाईनसह | ०४ | | |
| २ | मॅटर छपाई | ७० GSM म्यापली पेपर पाठपोठ | ११४ | | |
| ३ | फोटो पेज | १३० GSM पाठपोठ | २० | | |
| ४ | विभाग पेज ब्लॅक ॲण्ड व्हाईट | १०० GSM आर्ट पेपर एक पाठपोठ | १६ | | |
| ४ | बायडिंग चार्जेस | साईड पिनिंग ॲण्ड कव्हर पेस्टिंग | | | |
| ५ | | | १५४ | एकूण | |
| ६ | | पर कॉपी रेट | | | |

सदर निविदा विहित नमुन्यात दिनांक २७/०९/२०२२ ते ०३/१०/२०२२ पर्यंत सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत महाविद्यालयाच्या कार्यालयात जमा करावी. निविदा उघडण्याच्या तारखेची माहिती सबंधित कंत्राटदारांना दिली जाईल.

**सही/-**
**प्राचार्य**
**महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors / agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following works under EHV Testing. Dn., Panvel

| Sr. No. | Tender No. | Description | Estimated Amount in Rs. | EMD in Rs. | Tender fee in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 2 | EE/PAC/DN./PNL/TECH/ Ten - 8/2022-23 RFX no. 7000024576 | RE - tender for providing services of 4nos. (semi-skilled labour) as assistant technician (general) and 1no. of (skilled labour) as senior technician (trans system) required at PAC Dn., Panvel. | 7,10,979.71 | 7109.8 | 500/- + GST |

**Submission of bids from 26.09.2022 to 03.10.2022 up to 23.59 hrs, Bid opening date and time:- 04.10.2022 at 10:00 hrs (Technical) and at 11:00hrs (Commercial) if possible.**
**For further details visit our Mahatransco E-Tendering website https://srmetender.mahatransco.in**
**Contact person: The Executive Engineer - 8788074706**
**The Dy. Executive Engineer (O) - 9619499485**
**Note :- All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - https://srmetender.mahatransco.in.**

**Sd/-**
**Executive Engineer**
**PAC Dn., Panvel**

# सेवा प्रलंबित अर्ज निकाली काढा

## नवी मुंबई महापालिकेला लोकसेवा हक्क आयोगाकडून सूचना

**नवी मुंबई : बातमीदार**

विहित कालावधीत नागरिकांना सेवा उपलब्ध करून देणे हे आपले कर्तव्य असून त्यामधील अडचणी स्वाधिकारे दूर करून अंमलबजावणीत प्रलंबितता राहू नये याबाबत तत्पर कार्यवाही करण्याचे सूचित करीत राज्य लोकसेवा आयोगाचे कोकण महसूली विभाग आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी सेवा पंधरवडा कालावधीत अधिकारी, कर्मचारी यांनी पुढाकार घेऊन सेवांबाबतचे प्रलंबित अर्ज निकाली काढावेत अशा सूचना केल्या.

१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता हा सेवा पंधरवडा राबविला जात असून या अंतर्गत विशेष प्राधान्याने निकाली काढावयाच्या अधिसूचित सेवांबाबतचा तसेच महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीबाबत नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात आयोजित आढावा बैठकीप्रसंगी डॉ. किरण जाधव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने नागरिकांना ५१ लोकसेवा उपलब्ध करून दिल्या जात असून त्यामधील २८ लोकसेवा ऑनलाईन पध्दतीनेही उपलब्ध आहेत ही सकारात्मक बाब असल्याचे नमूद करीत ९० टक्केपेक्षा अधिक सेवा विहित कालावधीत उपलब्ध करून दिल्या जात असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

नागरिकांना विविध सेवा पुरविण्याची संधी आपल्याला लाभलेली आहे याची जाणीव ठेवून प्रत्येकाने काम करण्याची गरज असल्याचे अधोरेखित करीत डॉ. किरण जाधव यांनी कोणताही अर्ज नाकारण्यापूर्वी त्या अर्जदाराला आवश्यक त्या सर्व संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत, असे मत व्यक्त केले. सेवा पंधरवड्याच्या कालावधीत प्रलंबित अर्ज नागरिकांना सेवा पुरवून निकाली काढावेत अशाही सूचना त्यांनी केल्या.कोविड काळात आयुक्त अभिजित बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबईत अतिशय प्रभावी काम झाल्याचा विशेष उल्लेख करीत स्वच्छतेमध्ये नवी मुंबई नेहमीच आघाडीवर असते सेवा पंधरवड्याच्या कालावधीतही प्रलंबित सेवा अर्जांचा निपटारा करण्याचे नवी मुंबईचे काम सर्वोत्तम असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या वेळी आयोगाचे सहसचिव मानिक दिवे व इतर अधिकारी तसेच महापालिकेचे सर्व विभागप्रमुख, सेवांशी संबंधित अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संवाद साधून अडचणी व शंकांचे निरसन

*महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी राज्य लोकसेवा आयोगाचे कोकण महसूली विभाग आयुक्त डॉ. किरण जाधव यांचे स्वागत केले. अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांनी महापालिकेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या लोकसेवांबाबतचा सविस्तर अहवाल सादर केला. डॉ. किरण जाधव यांनी ऑनलाइन सेवांची कार्यपध्दती प्रत्यक्ष जाणून घेतली. उपस्थितांशी संवाद साधत सेवा पुरविण्यात येणाऱ्या अडचणी, सूचना जाणून घेतल्या व शंका निरसन केले.*

# नवरात्रोत्सवात वीजपुरवठा खंडित करू नका; भाजप युवा मोर्चाकडून निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



भारतीय जनता युवा मोर्चाचे पनवेल शहर अध्यक्ष रोहित जगताप यांनी नवरात्रोत्सवात वीजपुरवठा खंडित करू नका, अशी मागणी केली आहे. या संदर्भात त्यांनी पनवेल महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता पी. आर. बोके यांना निवेदन दिले आहे. तसेच या विषयासंदर्भात भेट घेऊन चर्चा केली.

गणेशोत्सवाच्या काळात पनवेल शहरात वारंवार वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे सार्वजनिक गणेश मंडळांना व नागरिकांनादेखील खूप मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागला. सोमवारपासून सुरू होणाऱ्या नवरात्रोत्सावात पनवेल शहर परिसरातील वीजपुरवठा वारंवार खंडित होणार नाही याची आपण काळजी घ्यावी, असे जगताप यांनी निवेदनात नमूद केले आहे.

निवेदन देतेवेळी युवा मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष रोहित जगताप यांच्यासह सरचिटणीस गौरव कांडपिळे, सदस्य अक्षय सिंग, नितेश घुगे आदी उपस्थित होते.



पनवेल : श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मिडलक्लास सोसायटी मित्र मंडळाच्या विराजमान देवीचे वर्षा प्रशांत ठाकूर, नीता झुंजारराव, ज्योती झुंजारराव, अर्पिता मोकल, स्वाती कोळी आदींनी दर्शन घेतले.



पनवेल : अभिनव सामाजिक विकास मंडळाच्या वतीने गुळसुंदे येथे आयोजित करण्यात आलेल्या नवरात्रोत्सवात सोमवारी दुर्गादेवीची प्रतिष्ठापना करण्यात आली.



पनवेल : नवरात्रोत्सवात तालुक्यातील कोंडले गावात गावदेवी मित्र मंडळाच्या वतीने विराजमान करण्यात आलेली देवी.

# सीकेटी विद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात शनिवारी (दि. २४) राष्ट्रीय सेवा योजना दिन (एनएसएस डे) उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त व्याख्यानमाला पुष्प दुसरे अंतर्गत आनंद कुलकर्णी यांचे आजच्या युवकांचे अधिकार व कर्तव्य या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

आपली लोकशाही आदर्श व समानता मानणारी आहे. त्यामुळेच सामान्य कुटुंबातील व्यक्ती देशाच्या सर्वोच्च पदावर पोहचतात. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दाखला देत व्याख्यात्यांनी युवकांचे अधिकार व कर्तव्य या विषयावर विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. व्याख्यानासाठी कला विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे तर विज्ञान व वाणिज्य विभागाचे पर्यवेक्षक प्रशांत मोरे तसेच विद्यार्थी व शिक्षक यांची उपस्थिती लाभली. एन. एस. एस. युनिटचे कार्यक्रम अधिकारी विवेक पाटील व गणेश पाटील यांनी या व्याख्यानाचे सुंदर आयोजन केले. एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे ही प्रार्थना म्हटली.

नेहल पाटील व ध्वनी सावंत या विद्यार्थिनींनी या कार्यक्रमाचे निवेदन केले. प्रीती झगडे हिने व्याख्यात्यांचा परिचय करून दिला. सृष्टी जाधव या विद्यार्थिनीच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.



# 'सीकेटी'त संशोधन पद्धती मार्गदर्शन, एम. एस. एक्सेल प्रशिक्षण कार्यशाळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (स्वायत्त) येथे शनिवारी (दि. २४) सकाळी ९ वाजता राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियाना अंतर्गत, महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवानिमित्त बी. एम. एस. विभागातर्फे संशोधन पध्दती मार्गदर्शन आणि एम. एस. एक्सेल प्रशिक्षण या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

व्यासायिक व्यवस्थापन महाविद्यालय, हैद्राबाद विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. डॉ. राजा शेखर बेलामकोंडा आणि संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे हे प्रमुख पाहुणे म्हणून होते. या वेळी प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, वाणिज्य शाखेचे प्रमुख प्रो. डॉ. एस. बी. यादव, वाणिज्य विभाग प्रमुख प्रो. डॉ. एलिझाबेथ मॅथुज, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. शैलेश वाजेकर उपस्थित होते.

प्राचार्य पाटील यांनी महाविद्यालयाविषयी माहिती दिली व डॉ. गडदे यांनी सर्व विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना संशोधन क्षेत्रात कार्यरत राहण्यासाठी भाषण केले. पाहुण्यांचा परिचय आणि कार्यशाळेची विस्तृत माहिती बी. एम. एस. विभागाच्या प्रमुख प्रा. मेनका नलावडे यांनी सादर केली. कुलगुरू प्रो. डॉ. राजा शेखर बेलामकोंडा यांनी संशोधक सहयोगीना आणि विद्यार्थ्यांना संशोधन कौशल्याची मूलभूत कौशल्य वाढवण्याबाबत मार्गदर्शन तसेच एम. एस. एक्सेलचे प्रशिक्षण दिले.सूत्रसंचालन बी. एम. एस. विभागाच्या प्रा. देवश्री गाडगीळ आणि प्रा. मीशाल जँसी यांनी केले. तसेच बी. एम. एस. विभागातील विद्यार्थिनी लावण्या दसारी हिने उपस्थितांचे आभार मानले. बी. एम. एस. विभागाच्या प्रमुख, त्यांचे सहकारी प्राध्यापक यांनी ही कार्यशाळा यशस्वीरित्या पार पडण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर यांनी कौतुक केले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात फॅकल्टी एक्सचेंज प्रोग्रॅम

**खारघर : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात अकाउंट अ‍ॅण्ड फायनान्स विभागातर्फे सोमवारी (दि. २६) फॅकल्टी एक्सचेंज प्रोग्रॅम आयोजित करण्यात आला.

फॅकल्टी एक्सचेंज प्रोग्रॅममध्ये प्रा. प्रवर शर्मा यांनी पनवेल येथील रयत शिक्षण संस्थेचे महात्मा फुले आर्ट्स कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स या महाविद्यालयामध्ये जाऊन द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना अकाउंट अ‍ॅण्ड फायनान्सचे व्याख्यान दिले व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या विषयांमधील विद्यार्थ्यांना असणाऱ्या समस्यांचे निरसन केले व त्यांचे अनुभव शेअर केले. पनवेल येथील महात्मा फुले महाविद्यालयातील अकाउंट अ‍ॅण्ड फायनान्स विभागातील काही प्राध्यापकांनी खारघर येथील रामशेठ ठाकूर महाविद्यालयात येऊन तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व त्यांचे अनुभव शेअर केले.

या फॅकल्टी एक्स्चेंज कार्यक्रमाचा फायदा दोन्ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरमध्ये होणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड व महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी कार्यक्रमासाठी परवानगी दिली व शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आयोजन अकाउंट अ‍ॅण्ड फायनान्स विभागाचे प्रमुख प्रा. प्रवर शर्मा यांनी केले तसेच प्रा. मोसमी लांबे यांनी सहकार्य केले.

# भौतिकशास्त्र विभागातर्फे परिसंवाद

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात भौतिकशास्त्र विभागातर्फे सोमवारी (दि. २६) लाईफ अ‍ॅण्ड डेथ ऑफ स्टार्स या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला.

या परिसवांदासाठी ईसार पुण्याचे संशोधन अभ्यासक पवन खाडेकर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांनी आकाशातील ताऱ्यांबद्दल मॉलिक्युलर, क्लाऊड साइज ऑफ स्टार्स वाईट डोर न्यूट्रॉन स्टार्स रोटेशन ऑफ स्टार्स, ब्लॅक होल्स या विषयावर सविस्तर माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन केले.

प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाच्या समन्वयक इतर प्राध्यापक वृंद आदी उपस्थित होते. तसेच सुमारे ३० विद्यार्थी या परिसंवादासाठी उपस्थित होते. या व्याख्यानाचे आयोजन भौतिकशास्त्र विभागाचे प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी केले तसेच प्रा. प्रथमेश उदेकर यांनी सहकार्य केले.



# कचऱ्यातून साकारला ६० फूट फ्लेमिंगो

**नवी मुंबई : बातमीदार**



नवी मुंबई शहरातील पर्यावरणप्रेमी नागरिकांच्या सहभागातून पाम बीच मार्गानजिकच्या विस्तृत खाडीकिनारा परिसरात स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये मॅनग्रुव्हज सोल्जर, जयश्री फाऊंडेशन, डिव्हाईन फाऊंडेशन या स्वच्छता व पर्यावरणविषयक नियमित कार्यरत असणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी तसेच महाविद्यालयांतील एनसीसीचे विद्यार्थी आणि जागरूक नागरिक अशा २०० हून अधिक नागरिकांमार्फत राबविण्यात आला.

मोकळ्या जागेत कचरा आणल्यानंतर तो विशिष्ट प्रकारे ठेवण्यासाठी टाकाऊ साहित्यापासून कलात्मक वस्तू, शिल्पाकृती तयार करणाऱ्या किशोर विश्वास आर्ट्स संस्थेच्या प्रतिनिधींनी जमिनीवर ६० फूट लांब व ३२ फूट रूंद फ्लेमिंगो पक्षाची रेखाकृती जमिनीवर आखून ठेवली होती. या फ्लेमिंगो आकृतीच्या कोणत्या भागात कोणत्या स्वरूपाचा कचरा ठेवायचा याचे नियोजन आधीच करून ठेवण्यात आले होते. त्यानुसार फ्लेमिंगो रेखाकृतीच्या विशिष्ट भागात गोळा केलेल्या कचऱ्यातील विशिष्ट प्रकारचा कचरा ठेवण्यात आला व याव्दारे जमिनीवर ६० X ३२ फूट आकाराची फ्लेमिंगोची भव्य आकर्षक प्रतिकृती तयार झाली.

या कांदळवन स्वच्छता मोहीमेचे आयोजन महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन व स्वच्छ महाराष्ट्र अभियान कक्षाच्या वतीने करण्यात आले होते. पामबीच मार्गावरील तिरंगा झळकावित विक्रमी ७.५ किमी अंतराच्या मानवी साखळीचा उपक्रम पार पाडल्यानंतर त्यामध्ये सहभागी २०० हून अधिक पर्यावरणशील नागरिक व युवक पामबीच मार्गाजवळील टी.ए.चाणक्य शेजारील शिवमंदिराच्या परिसरात जमा झाले आणि त्यांनी तेथील कांदळवन व परिसराची स्वच्छता केली.






दुर्गामाता दौड (माळ पहिली) पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान पनवेल विभागाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही दुर्गामाता दौडचे नऊ दिवस आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक उपक्रमाची पहिली माळ पनवेल शहरात गुंफण्यात आली. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळा येथून दुर्गामाता दौडला प्रारंभ झाला. पुढे ही दौड पनवेलचे ग्रामदैवत असलेल्या जाखमाता मंदिरात पोहचली. तेथे आरती करण्यात आली. त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, कर्मवीर भाऊराव पाटील पुतळा, भाजी मार्केट अशी फिरून दौड पुन्हा शिवरायांच्या पुतळ्यापाशी आली व तिथे आरती करून सांगता झाली. या दौडला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. युवकांसोबतच नागरिक, महिला, लहान मुले दौडमध्ये सहभागी झाल्याचे पहावयास मिळाले.




वाचाल तर वाचाल!
जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

**जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...**

महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या रविवारी 'दैनिक राम प्रहर'च्या अंकात वाचा नवे पाक्षिक सदर वाचाल तर वाचाल. या सदरात दर पंधरवड्याला आमच्या प्रिय वाचकांच्या भेटीला आणणार आहोत.

साहित्यिकांची आवडती पुस्तके येत्या २ ऑक्टोबर २०२२ रोजीच्या रविवारी वाचूया डॉ. शीतल मालुसरे (महाड) यांच्या आवडत्या पुस्तकांविषयी त्यांच्याच लेखातून.

# भारताचा मालिका विजय

## निर्णायक टी-२० सामन्यात ऑस्ट्रेलियावर सरशी

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

सूर्यकुमार यादव (३६ चेंडूंत ६९ धावा) आणि विराट कोहली (४८ चेंडूंत ६३) यांच्या झंझावाती अर्धशतकांच्या जोरावर भारताने तिसऱ्या आणि निर्णायक ट्वेन्टी-२० क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियावर सहा गडी आणि एक चेंडू राखून सरशी साधली. या विजयासह भारताने तीन सामन्यांची मालिका २-१ अशी फरकाने जिंकली.

हैदराबाद येथे झालेल्या तिसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने दिलेले १८७ धावांचे आव्हान भारताने १९.५ षटकांत पूर्ण केले. भारताच्या डावाची सुरुवात अडखळती झाली. सलामीवीर केएल राहुलला (१) डावखुरा वेगवान गोलंदाज डॅनियम सॅम्सने पहिल्याच षटकात माघारी पाठवले. गेल्या सामन्यातील भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावणारा कर्णधार रोहित शर्माही केवळ १७ धावा करून पॅट कमिन्सच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यामुळे भारताची २ बाद ३० अशी स्थिती झाली होती.


### सूर्यकुमार, विराटची झुंझार अर्धशतकी खेळी




सूर्यकुमार (पाच चौकार व पाच षटकार) आणि विराट (तीन चौकार आणि चार षटकार) या जोडीने प्रतिहल्ला करीत ऑस्ट्रेलियन गोलंदाजांवर दडपण टाकले. या दोघांनी तिसऱ्या गड्यसाठी १०४ धावांची भागीदारी रचत भारताच्या विजयाच्या आशा कायम ठेवल्या. सूर्यकुमार मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात ६९ धावांवर बाद झाला. यानंतर विराटला हार्दिक पांड्याची (१६ चेंडूंत नाबाद २५) तोलामोलाची साथ लाभली. अखेरच्या षटकात भारताला विजयासाठी ११ धावांची आवश्यकता होती. विराटने पहिल्या चेंडूवर षटकार मारल्यानंतर सॅम्सने त्याला माघारी पाठवले, मात्र दोन चेंडूंत चार धावांची गरज असताना हार्दिकने चौकार मारत भारताचा विजय साकारला.

तत्पूर्वी ऑस्ट्रेलियाने २० षटकांत ७ बाद १८६ अशी धावसंख्या उभारली. कॅमेरुन ग्रीनने सुरुवातीपासून फटकेबाजी करताना २१ चेंडूंत सात चौकार आणि तीन षटकारांच्या साहाय्याने ५२ धावांची खेळी केली. अक्षर पटेलपुढे ऑस्ट्रेलियाची मधली फळी ढेपाळली, परंतु टीम डेव्हिडने २७ चेंडूंत दोन चौकार आणि चार षटकारांसह ५४ धावांची खेळी करताना ऑस्ट्रेलियाकडून पहिले अर्धशतक केले. सॅम्सने (२० चेंडूंत नाबाद २८) अखेरच्या षटकांत फटकेबाजी करीत ऑस्ट्रेलियाला १८० धावांपलीकडे पोहचवले.

# द. आफ्रिकेविरुद्ध मालिकेसाठी हार्दिक, भुवनेश्वरला विश्रांती



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणाऱ्या टी-२० मालिकेसाठी भारताचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या आणि भुवनेश्वर कुमार या दोघांना विश्रांती देण्यात आली. टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका मालिकेला २८ सप्टेंबरपासून सुरुवात होणार आहे.

ऑस्ट्रेलियाविरुद्धची टी-२० मालिका भारताने जिंकली असली तरी गोलंदाजांची कामगिरी सुमार झाली. अक्षर पटेल वगळल्यास अन्य गोलंदाज प्रभाव पाडण्यात अपयशी ठरले. भुवनेश्वर कुमार हा महागडा गोलंदाज ठरला, तर पुनरागमन करणारा हर्षल पटेल व जसप्रीत बुमराह यांना फार काही छाप पाडता आली नाही.


दुसरीकडे फलंदाजीत विराट कोहली, रोहित, लोकेश राहुल, सूर्यकुमार यादव यांचा परतलेला फॉर्म ही संघासाठी जमेची बाजू आहे. हार्दिक पांड्या फलंदाजीत योगदान देतोय, परंतु रोहित त्याच्याकडून जपूनच गोलंदाजी करून घेताना दिसला. रवींद्र जडेजाच्या दुखापतीमुळे संघात आलेल्या अक्षरने जागा पक्की केलीय. ऋषभ पंतपेक्षा रोहित अनुभवी दिनेश कार्तिकवर विश्वास दाखवताना दिसला.

द. आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेला २८ डिसेंबर रोजी तिरुअनंतपुरम येथून सुरुवात होणार आहे. या मालिकेसाठी अर्शदीप सिंग व दीपक हुडा यांचे पुनरागमन होत आहे. मोहम्मद शमीला कोविड झाल्याने ऑस्ट्रेलियाविरुद्धची मालिकेतून माघार घ्यावी लागली होती आणि आफ्रिकेविरुद्ध तो तंदुरूस्त आहे की नाही याची माहिती अजून समोर आलेली नाही. दीपक हुडाचीही पाठदुखी बळावल्याचे वृत्त समोर येतेय. त्यामुळे तो या मालिकेला मुकू शकतो. भुवी व हार्दिकला या मालिकेत विश्रांती दिली गेली असल्याने दीपक चहरला संधी मिळण्याची अपेक्षा आहे.

**भारतीय संघ :** रोहित शर्मा (कर्णधार), लोकेश राहुल, विराट कोहली, सूर्यकुमार यादव, दीपक हुडा, ऋषभ पंत (यष्टीरक्षक), दिनेश कार्तिक (यष्टीरक्षक), आर. अश्विन, युजवेंद्र चहल, अक्षर पटेल, अर्शदीप सिंग, मोहम्मद शमी, हर्षल पटेल, दीपक चहर, जसप्रीत बुमराह.

# ऑस्ट्रेलियाच्या प्रशिक्षकाकडून अक्षर पटेलचे तोंडभरून कौतुक

**हैदराबाद : वृत्तसंस्था**



ऑस्ट्रेलियाविरूद्धच्या तिसऱ्या आणि निर्णायक टी-२० सामन्यात अक्षर पटेलने भेदक मारा करीत ऑस्ट्रेलियाच्या धावगतीला वेसण घातली. अक्षर पटेलने ॲरोन फिंच, जॉश इंग्लिस आणि फॉर्ममध्ये असलेल्या मॅथ्यू वेडची शिकार केली. त्याने चार षटकांत ३३ धावा देत ३ विकेट घेतल्या. विशेष म्हणजे त्याने एक झेल जरी सोडला तरी अप्रतिम थ्रो करत धोकादायक ग्लेन मॅक्सवेलला स्वस्तात पॅव्हेलियनमध्ये धाडले. अक्षर पटेलला मालिकावीराचा पुरस्कार देण्यात आला. दरम्यान, अक्षर पटेलवर ऑस्ट्रेलियाचे प्रशिक्षक अँड्र्यू मॅकडोनाल्ड खूष दिसले.

सामना झाल्यानंतर मॅकडोनाल्ड यांनी अक्षर पटेलचे तोंडभरून कौतुक केले. ते म्हणाले की, अक्षर पटेलसाठी ही मालिका खूप चांगली गेली. ज्या वेळी भारतीय संघातून जडेजा बाहेर गेला त्या वेळी सर्वांना वाटले की ही आता भारताची दुखरी नस ठरले, परंतु भारताला दुसरा जडेजा सापडला.


दरम्यान, आगामी वर्ल्डकपसाठी कोणत्या गोष्टी डोकेदुखी ठरतील असे विचारले असता मॅकडोनाल्ड म्हणाले, या संपूर्ण मालिकेत रन रेट जास्त होता. हे मनोरंजनाचे क्रिकेट आहे. बॅट बॉलवर भारी पडत होती. त्यामुळे गोलंदाजांना स्लॉग ओव्हरमध्ये लपण्याची जागाच नव्हती.

ते पुढे म्हणाले की, आम्ही काही योजना आखल्या होत्या. त्याचे काही चांगले रिझल्टदेखील मिळाले आहेत. आम्ही त्याचा वापर आगामी वर्ल्डकपसाठी देखील करू. त्यांनी वर्ल्डकमध्ये संघात मिचेल स्टार्क, स्टायनिस आणि डेव्हिड वॉर्नर संघात परततील असे सांगितले. स्टार्क परतल्याने गोलंदाजीची धार अजूनच वाढेल, असे ते म्हणाले.

# लेव्हर चषक टेनिस स्पर्धेत जोकोव्हिचचा दुहेरी विजय

**लंडन : वृत्तसंस्था**

दोन महिन्यांच्या विश्रांतीनंतर नोव्हाक जोकोव्हिचने टेनिस कोर्टवर



दमदार पुनरागमन करताना लेव्हर चषक टेनिस स्पर्धेत युरोप संघासाठी एकेरी आणि दुहेरीच्या लढतीत विजयांची नोंद केली. त्याच्या कामगिरीमुळे युरोप संघाने जागतिक संघाविरुद्ध ८-४ अशी आघाडी घेतली आहे.

जोकोव्हिचने एकेरीत जागतिक संघाच्या फ्रान्सिस टिआफोचा ६-१, ६-३ असा पराभव केला. त्यानंतर तासाभरात त्याने इटलीच्या माटेओ बेरेट्टिनीच्या साथीने जागतिक संघाच्या जॅक सॉक-ॲलेक्स डी मिनौर जोडीला ७-५, ६-२ असे पराभूत केले.

**नवरंग (रंग पांढरा)**



जय बजरंग कला, क्रीडा व सांस्कृतिक महिला मंडळ, कोपर, पनवेल



गावदेवी सार्वजनिक महिला मंडळ, वाकडी, पनवेल. (छाया : सुरज पाटील)

# टी-२०मध्ये विराटचा अनोखा विक्रम



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा आधारस्तंभ आणि प्रमुख फलंदाज विराट कोहलीने एका दिग्गज ऑस्ट्रेलियन फलंदाजाला मागे टाकले आहे. विराट आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये एका देशाविरुद्ध सर्वाधिक वेळा ५० किंवा त्यापेक्षा मोठी खेळी करणारा फलंदाज ठरला आहे. त्याने ऑस्ट्रेलियन दिग्गज डेविड वॉर्नरचा विक्रम मोडीत काढला. भारताकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांत विराट दुसऱ्या क्रमांकावर पोहचला आहे.

भारताचा माजी कर्णधार विराट कोहली याने ही कामगिरी ऑस्ट्रेलिया संघाविरुद्ध टी-२० सामने खेळताना केली आहे. त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध झटपट सामने खेळताना एकूण आठ वेळा ५० किंवा त्यापेक्षा मोठी खेळी केली आहे. हा एक विश्वविक्रम ठरला आहे. यापूर्वी हा विक्रम ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर डेव्हिड वॉर्नरच्या नावावर होता. वॉर्नरने श्रीलंका संघाविरुद्ध एकूण सात वेळा ५० किंवा त्यापेक्षा मोठी खेळी केली आहे.

## भारत अ संघाची न्यूझीलंड अ संघावर विजयी आघाडी

# कुलदीप यादवची हॅट्ट्रिक



**चेन्नई :** फिरकीपटू कुलदीप यादवने हॅट्ट्रिकसह चार बळी मिळवल्यानंतर पृथ्वी शॉने (४८ चेंडूंत ७७ धावा) केलेल्या फटकेबाजीच्या जोरावर भारत अ संघाने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंड अ संघाचा चार गडी राखून पराभव केला. यासह भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे. प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडचा डाव ४७ षटकांत २१९ धावांवर आटोपला. जो कार्टरने ७२, तर रचिन रिवद्रने ६१ धावांचे योगदान दिले. कुलदीपने लोगन व्हॅन बिक (४), जॉ वॉकर (०) आणि जेकब डफी (०) यांना सलग तीन चेंडूंवर बाद करीत हॅट्ट्रिक साकारली. त्याने ५१ धावांत चार गडी बाद केले. राहुल चहर आणि रिषी धवन यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. त्यानंतर पृथ्वीच्या तडाखेबंद खेळीमुळे भारताने २२० धावांचे लक्ष्य ३४ षटकांत सहा गड्यांच्या मोबदल्यात गाठले.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com